
जयश्री पटवर्धन

# अनमोल

## व्यक्तिरेखा आणि विचार



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

स्मरणे आणि भावबंध

# अनमोल

## व्यक्तिरेखा आणि विचार

लेखिका : जयश्री पटवर्धन

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# अनमोल - व्यक्तिरेखा आणि विचार

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अनमोल- व्यक्तिरेखा आणि विचार


## लेखिका : जयश्री पटवर्धन

पत्ता- 20/1A/1 प्लॉट नं 3, विनायक बंगला,
बसवनगर रोड
कागवाड 591223
कर्नाटक.
फोन नं- 7406983273



मुखपृष्ठ: सुनीळ सामंत (ठाणे)
निर्मितीसहाय्य- अंजना लगस (कोल्हापूर)



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यापुर्वी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

या नंबरवर नावगाव कळवा. पुस्तके मिळवा.

प्रकाशन : १८ फ़ेब्रुवारी २०२३ (महाशिवरात्र २०२३)


©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# जयश्री पटवर्धन



## परिचय

सांगली माझे माहेर. वयाच्या विसाव्या वर्षी मला एम. एस. ई .बी. मध्ये नोकरी मिळाली. सहा वर्षे नोकरी केल्यावर माझा विवाह कागवाड च्या श्री सतीश पटवर्धन यांचे बरोबर झाला. पटवर्धन घराणे हे संस्थानिकांचे. पण कूळ कायदा व 1948 ची जाळपोळ यामुळे त्यांचे बरेच नुकसान झाले. हे संस्थान 1857 मध्येच विलीन झाले होते. त्यामुळे पुढील पिढ्यातील मुलांनी अर्थार्जनासाठी शिक्षणानंतर नोकरी स्विकारली. पटवर्धन मंडळी खेड्यात राहात असली तरी खूप आधुनिक विचारांची व अतिशय सुसंस्कृत अशी होती. मनाने ती श्रीमंत होती. त्यामुळे सांगली सारख्या शहरातून मी खेड्यात आले याचे दुःख मला झाले नाही. वयाच्या चाळीसाव्या वर्षापासून मी सामाजिक कार्यात भाग घेऊ लागले व विविध सामाजिक उपक्रम राबविले. माझे वडील गीता प्रवचनकार होते. त्यामुळे लहानपणापासूनच कर्मयोगाचे संस्कार आम्हा सर्व भावंडांच्या वर झालेले होते. कागवाड येथील मराठी शाळेचे इमारत बांधकाम मी त्यात भाग घेऊन हिरिरीने केले. येथे विविध प्रकारची शिबिरे आम्ही घेतली. रक्तदान, नेत्रदान, अपंगांसाठी उपयोगी साधने देण्याचे शिबीर, मुलांसाठी शैक्षणिक शिबिर, महिला शिबीर, ही शिबिरे लोकांना खूपच आवडली.

मी वैयक्तिक स्तरावर ही सामाजिक कामे केली. मला वाचनाची अतिशय आवड. आवडलेल्या पुस्तकांच्या लेखकांना मी आवर्जून पत्र लिहायची. बऱ्याच लेखकांची मला उत्तरे देखील आली आहेत. त्यातूनच काही लेखकांची व्याख्यानेही येथे आयोजित केली.

मतिमंद मुलांकडून शाळेतून ज्या कलावस्तू बनवून घेतल्या जातात, त्या विक्रीच्या माध्यमातून मी लोकांसमोर आणीत होते. हेतू एवढाच की त्या मुलांना अर्थाजन व्हावे. या वस्तू विक्रीच्या वेळी एक चांगला अनुभव मला आला आहे. सांगली येथील गाडगीळ सराफ यांचेकडे मी जायचे ठरवले. सांगलीतील आमदार सुधीर दादा गाडगीळ यांना मी भेटले व मतिमंद मुलांसाठी च्या कलावस्तू विक्रीबाबतची माझी कल्पना त्यांना सांगितली. या गाडगीळ मंडळींचे विश्रामबाग येथेही सराफी दुकान आहे. दिवाळीच्या वेळी जर ग्राहकाने दहा ग्रॅम सोने घेतले तर त्याला त्यांच्या दुकानाच्या वतीने मतिमंद मुलांनी बनवलेल्या वस्तूपैकी एक वस्तू गिफ्ट म्हणून द्यावी. त्यात गाडगीळ यांचेही नाव होईल व मुलांना अधिक अर्थार्जन मिळेल. त्यांना ही कल्पना आवडली. आमदारांनी मला त्यांच्या दुकानी पाठविले. मी त्यांना वस्तुंचा कॅटलॉग दाखवला. त्यातून त्यांनी मोबाईल ठेवण्यासाठीची पर्स निवडली आणि एकंदर ऐंशी हजार रुपयाच्या मोबाईल पर्सेस मागविल्या. आम्हाला खूप आनंद झाला. खरंच दुसऱ्यासाठी काही करत असताना त्यात यश आले की मिळणारं समाधान वेगळच असतं!

मी कागवाड ग्रामपंचायतीमध्ये निवडून येण्यासाठी दोन वेळेला निवडणुकीस उभे राहून निवडून आले व दहा वर्षे ग्रामपंचायतीत काम केले. हेतू एवढाच होता की पंचायतीत चाललेला कारभार पहावा व समाजासाठी पंचायतीच्या वतीने काही

करता आले तर करावे. माझ्या आयुष्यात मी समाजाकडूनही भरपूर आदर मिळवला. पुढे निवडून आलेले सरपंचही माझा सल्ला विचारायला घरी येत असत. अर्थात मी जे हे सर्व करु शकले ते माझ्या पतीच्या पुर्ण पाठिंब्यामुळेच. असा नवरा मिळायलाही भाग्य लागते. ते मला मिळाले व त्यामुळे मी समाधानी आयुष्य जगू शकले.

-जयश्री पटवर्धन

# मनोगत -

माझे चौथे पुस्तक वाचकांच्या हाती देतांना खूप आनंद होतो आहे. मला पत्रं लिहिणं खूप आवडायचं. त्यावेळी फोनही नव्हते. त्यामुळे नातेवाईकांना मी पत्रे लिहायची. त्यांची पण सविस्तर उत्तरे यायची. पुस्तक वाचनामुळे मी लेखकांनाही पत्रे लिहायची. त्यांची उत्तरेही माझ्यासाठी एक अनमोल ठेवा असायचा. ही लेखनाची आवड जी पत्र लेखनापूर्ती मर्यादित होती ती करोनालाटेमुळे उसळून वर आली. करोनामुळे बाहेर जाणे कमीच झाले. त्यामुळे मी लेखनाकडे वळले. सामाजिक कामामुळे, वॉट्सॅपमुळे माझ्या अनेकांशी ओळखी झाल्या. चाकोरीबाहेरील कामे करणाऱ्या व्यक्तींचेवर मी लिहायचे ठरवले. माझे चौथे पुस्तक अशाच काही आगळया-वेगळया 10 व्यक्तीमत्त्वावर लिहिले आहे.

माझ्या पुस्तकातील लेखामुळे आणखी काही लोकांना या व्यक्तींच्या कार्याची ओळख होईल. त्यांना यांच्या कार्यामुळे प्रेरणा मिळेल हीच सदिच्छा.

**आपली,**

**जयश्री पटवर्धन**

## आभार

या चौथ्या पुस्तकात मी ज्या व्यक्तींचेवर लेख लिहिले आहेत त्यांनी अत्यंत आदराने, नम्रतेने मला स्वतःच्या कार्याची माहिती फोनवर सांगितली त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

ई- साहित्याचे प्रकाशक श्री.सुनीळ सामंत यांनी तर मला सतत प्रोत्साहन दिलेच पण मुखपृष्ठ तयार करण्यासाठी बहुमोल सहाय्य केले त्याबद्दल मी त्यांची खूप आभारी आहे.

माझे सर्व लेख लिहून झाल्यानंतर मी श्रीमती अंजना लगस कोल्हापूर हिच्याकडे पाठवले व तिने ते टाईप करून दिले. टाईप करतांना झालेल्या चुका न कंटाळता दुरुस्त करून दिल्या. तिचे सहाय्य खूपच मोलाचे आहे. याबद्दल तिला मनापासून धन्यवाद!

माझा भाचा श्री. अजित बापट पुणे याला माझे तिसरे पुस्तक गुंफियेला शेला खूप आवडले व त्याने त्या पुस्तकाचा आपल्या मित्रमंडळीत प्रसारही केला व ह्या नवीन पुस्तकासाठी शुभेच्छाही दिल्या. त्यांचेही मी मनापासून कौतुक करते...

**आपली,**

**जयश्री पटवर्धन**

# अर्पण पत्रिका

ज्यांच्या बरोबर

मी ५० वर्षांचे सहजीवन अतिशय आनंदाने जगले

ते माझे पती




**कै. सतीश पटवर्धन**

यांच्या पवित्र स्मृतीस

हा स्मृतींचा शेला अर्पण करीत आहे.

# अनुक्रमणिका

1 श्री.राम साठे
2 श्री.यतींद्र जोशी
3 श्री. वसंतराव आपटे
4 डॉ. राम गोडबोले
5 उद्योजक प्रसाद ताम्हणे
6 सौ. सुमती व कर्नल माधवराव आठवले
7 श्री समर्थ रामदास स्वामींचे वेळेचे व्यवस्थापन
8 श्री. सुधीर गद्रे
9 डॉ. वसुधा आपटे
10 सौ. नीलाताई खरे
11 दोन पिढीतले अंतर
12 वृद्धसेवा बुद्धिमत्ता
13 स्वधर्म
14 खेडे का सुधारत नाही!
15 नास्तीक
16 दीप अमावस्या
17 नवरात्री
18 करीअर करणाऱ्या स्त्रिया
19 वारी
20 पितृपंधरवडा

# श्री.राम साठे

श्री. राम साठे हे तसे मिरजेचेच आहेत. आता ते पुण्याला असतात. श्री. वेण्णास्वामींच्या मठात हे लहानपणी आजी व काकू बरोबर रोजच जायचे. सकाळी व संध्याकाळी सुद्धा तिथे चालणारे निरूपण, प्रवचन ऐकायला जायचे. तिथला तो मोठा नगारा, आरती याचे त्यांना आकर्षण होते. तेव्हा ते चौथी- पाचवीत शिकत होते. नगारा वाजवायला आवडायचे. प्रवचनातले फारसे कळले नाही तरी ते सर्व भक्तीभावने ऐकायचे. पाचवीत असतांना मिरज ते सज्जनगड पायी चालत आजी बरोबर गेले होते. त्यांची आजी ही पायी वारी नेहमीच करायची. तसेच आठवीत असतांना श्री. साठे, काकूंबरोबर मिरज पंढरपूर पायी वारीसाठी गेले होते! त्या काकू मिरज- पंढरपूर ही वारी 40 वर्षे करीत होत्या. हौस म्हणून यांनी या दोनीही वाऱ्या केल्या. पण याचे संस्कार त्यांचेवर झालेच. वारीच्या वेळी यांचे हातात वीणा द्यायचे. ते त्यांना गंमत म्हणून आवडायचे. पण या संस्कारानीच त्यांना घडवलं. आठवी- नववीत असतांना शाळेत संस्कृत विषय चालू झाला. म्हणून संपूर्ण भगवद्गीता यांनी वाचून काढली. तेव्हा त्याचा अर्थ त्यांना कळत नव्हता. पण असे संस्कार त्यांचेवर घडत गेले. पण पुढे मेडिकलला गेल्यावर त्यांनी संपूर्ण ज्ञानेश्वरी वाचून काढली. त्यावेळी मात्र त्यांना बऱ्याच गोष्टी समजत होत्या. पण तरीही कॉलेजमध्ये शिकत असतांना टिंगल- टवाळीचाच मूड होता. पण त्या नादात संपूर्ण ज्ञानेश्वरी वाचून

काढली हे महत्त्वाचे. वडिल सिव्हील इंजिनिअर. पण त्यांची फिरती असायची. त्यामुळे ते घरी कमी असायचे.

श्री. साठे यांचे पहिले शिक्षण मिरजेला झाले व पुढील सर्व शिक्षण पुण्यालाच झाले. पुण्याला असतांना वरदानंद भारती यांचं साहित्य पुष्कळ वाचले. खरे वाचन त्यांनी समाधी घेतल्या नंतरच झाले.

श्री. वरदानंदांशी आधी यांच्या भेटीगाठी पुष्कळच होत होत्या. त्यांच्याशी चर्चाही पुष्कळ व्हायची. सलग वाचन होत नव्हते. पण पूज्य वरदानंदांनी समाधी घेतल्यावर त्यांचे वाङ्मयाचे खरे वाचन झाले. इकडे त्यांना नाटकाचीही खूप आवड होती. आकाशवाणीवर यांनी बालकलाकार म्हणून नाटकाचे प्रयोग केले. त्यावेळी दूरदर्शन नव्हते. बालोद्यान, नभोनाट्य असे भरपूर कार्यक्रम आकाशवाणीवर केले. शाळेमध्ये असतांना एकपात्री प्रयोग, नाट्यवाचन असे शाळेपासूनच चालू होते. कॉलेजमध्ये आल्यावर मात्र नाटकात कामे चालू झाली. पहिल्यांदा लोकनाट्ये केली. विच्छा माजी पुरी करा, कथा अकलेच्या कांद्याची, टुरटुर, मी लाडाची मैना तुमची, वस्त्रहरण अशी लोकनाट्ये त्यांनी खूप केली. पळा पळा कोण पुढे पळे, अशा फॉर्सेस पण केल्या. कॉलेजमध्ये असतांना हे केले. कॉलेजच्या आठ वर्षाच्या काळात 20 नाटकात तरी त्यांनी कामे केली. मग नंतर ते संगीत नाटकाकडे वळले. गेली 30 वर्षे ते संगीत नाटके करीत आहेत. 25 नाटकांचे 1000 चे वरती प्रयोग केले आहेत. ययाती, देवयानी, मृच्छकटिक, मानापमान, सौभद्र, हे बंध रेशमाचे, कट्यार काळजात घुसली, पूर्वीची वीर वामनराव जोशींनी लिहिलेली रणदुंदूभी, उत्तरक्रिया शिवाय दीनानाथांनी केलेली नाटके तशाही नाटकाचे प्रयोग केले. त्यांना नाटकासाठी आठ राज्य नाट्य पुरस्कार, अभिनयाचे 3 नॅशनल Awards मिळाले. राज्य नाट्य

स्पर्धेमध्ये परीक्षक म्हणून चार वेळा गेले आहेत. तेथील नाटकांचा बक्षीस समारंभही यांचे हस्ते झाला.  त्यांना केशवराव दाते पुरस्कार जो नाट्य परिषदेच्या वतीने मिळाला तो सर्वोच्च मानला जातो. महानगर परिषदेच्या वतीने बालगंधर्व पुरस्कार ही मिळाला. नुकताच पुणे ग्रंथालयाचा Award मिळाला आहे. जो केवळ दिग्गज लोकांना मिळत होता.

1990 साली लॅबच्या वेळा सांभाळून नाटकात काम केले. अशी ही नाटकाची परंपरा चालू राहिली. त्यांनी 1990 साली चार पॅथॉलजी लॅब काढल्या. 25 लोक त्यांच्या लॅबमध्ये काम करतात. लॅबचा टर्न ओव्हर खूप मोठा आहे. लॅबच्या जोरावरच श्रीसमर्थांचे जे काम आहे ते केले. अडीच हजारावर भाषणे पुणे शहरातल्या 50% शाळा, महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, 80 टक्के तालुके शिवाय इंदोर, अहमदाबाद, दिल्ली, बेंगलोर जिथे- जिथे मराठी आहे तेथे- तेथे मनाच्या श्लोकावर भाषणे दिली. हे सगळं समर्थांनी सांगितलेल्या टाईम मॅनेजमेंट प्रमाणे केले आहे. रिकामा जाऊ नये एक क्षण हे देव पणाचे लक्षण याप्रमाणे काम केले. अमेरिका व कॅनेडामध्येही पंधरा भाषणे झाली. तेथे सुद्धा कट्यार काळजात घुसलीचा प्रयोग व नऊ भाषणे चार दिवसात केली. खरंतर पॅथॉलजी लॅबचे उत्पन्न चांगले असल्यामुळेच समर्थांचे कार्य मी पुष्कळ करू शकलो असे ते म्हणतात.  2008 साली समर्थांची जन्म चतुशताब्दी होती.  त्यांनी 2008 पासून आतापर्यंत अनेक वेबसाईट निर्माण केल्या. त्यामध्ये अत्यंत नामवंत वक्त्यांची व्याख्याने आहेत.

डॉ. सुषमा वाटवे व श्री. सुनील चिंचोळकर यांच्याशीही त्यांचा 15-20 वर्षे संपर्क होता. ही माणसे मोठी होती. त्यांच्या सहवासाचाही चांगला परिणाम झाला.

अनेक वृद्धाश्रमांना व अनाथाश्रमांनाही त्यांच्या दैनंदिन गोष्टीत श्री. साठे खूप मदत करतात. 40 मुले असलेले पाच अनाथाश्रम आहेत. त्यांच्या दैनंदिन गरजा म्हणजे दिवाळी फराळ पाच दिवसांसाठी, दप्तरे 200 द्यायची, 100 स्वेटर द्यायचे. पुण्याच्या आसपास ही अनाथाश्रम व वृद्धाश्रम आहेत.

ते म्हणतात माझे लॅबचे उत्पन्न चांगले असल्यामुळे मी हे करू शकतो. जिथे गरज आहे तेथे मदत करायची असे मी ठरविले आहे.

कितीतरी शाळातून विद्यार्थ्यांना यांनी मनाच्या श्लोकांची पुस्तके दिली. काही लोक त्यांना म्हणतात तुम्ही दिलेली ही पुस्तके मुले वाचतात का? ते म्हणतात देणे हे काम माझं आहे. दिल्यानंतर मी त्याबद्दल कोणताच विचार करीत नाही.

खरंच साठे सरांचं व्यक्तिमत्व हे सर्व अंगांनी समृद्ध आहे.

त्यांच्यावर बालपणापासून देव-धर्माचे संस्कार झाले. कळत नसतांनाही त्यांनी एक गंमत म्हणून गीता ज्ञानेश्वरी वाचली. आजीबरोबर मिरज सज्जनगड व मिरज पंढरपूर पायी वारी केली. पण नकळत हे संस्कार अंतरमनावर रुजतच असतात.

श्री. साठे सरांचे हे सगळे कार्य पाहून मी अचंबित झाले. श्री. समर्थांच्या शिकवणुकीप्रमाणे त्यांनी क्षणभर ही फुकट दवडला नाही. मिळालेला पैसा गरजूंना दिला. स्वतः चैन करून तो वाया घालवला नाही. पुन्हा कशाचाही अहंकार नाही. लॅबमध्ये काम करणाऱ्यांच्यामुळे मी हे सर्व करू शकलो. म्हणून त्यांना क्रेडिट देतातच!

नाटकात कामे करून प्रसिद्धी, किर्ती नक्कीच मिळवली. हे सांभाळून डॉक्टरी व्यवसाय, लॅब उत्तम तऱ्हेने सांभाळली. अध्यात्म स्वतःमध्ये रुजवले व इतरांनाही ते शिकविण्याचा प्रयत्न केला.

ह्यापेक्षा निराळा कर्मयोग तो काय असतो हो? या सर्व कर्मानि त्यांचे आयुष्य उजळून निघाले. त्यांच्या कार्याचे किती कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. अशा या कर्मयोगी व्यक्तीला मनापासून नमस्कार.

# □ श्री. यतींद्र जोशी

श्री. यतींद्र वासुदेव जोशी हे माझ्या मिस्टरांचे मावसभाऊ. पण यतींद्र यांच्या आईशी माझे संबंध आजपर्यंत मैत्रीचेच राहिले. त्यांनी माझ्याकडे भाच्याची बायको म्हणजे सून म्हणून कधीच पाहिले नाही. आपल्या कितीतरी गोष्टी त्या माझ्याशी शेअर करतात.

मी आतापर्यंत तीन पुस्तके लिहिली. चाकोरी बाहेर जाऊन ज्यांनी वेगळे काहीतरी केले आहे अशा व्यक्तींवर लेख लिहिले.

श्री. यतींद्रही असे आगळे - वेगळे व्यक्तिमत्व असणारे!

त्यांचा जन्म बेळगाव येथे 1953 साली झाला. पण शालेय शिक्षण मात्र सर्व मुंबईलाच झाले. त्यांचे पुढील शिक्षण पुण्याला झाले. कृषी महाविद्यालय पुणे येथून ते B.Sc. Agri झाले व M.Sc. Agri धारवाड कृषी महाविद्यालयातून झाले.

श्री. यतींद्र लहानपणी अत्यंत व्रात्य होते. दुसऱ्याच्या खोड्या काढण्यात पटाईत. अभ्यासाची अजिबात आवड नसलेले. आई शाळेत पोहचवून आली की तिच्या पाठोपाठ ते घरी परत येत. पाठोपाठ दोन तास गणिताचे आहेत म्हणून ते घरी परत येत. आई- वडिलांना वाटे निदान त्याने 'अ' वर्ग तरी सोडू नये. 'अ' वर्गात त्यांचा नंबर शेवटचा होता.

कॉलेजमध्ये सुद्धा कसून अभ्यास, मोठं यश मिळवीन हे नव्हतंच. महत्त्वाकांक्षा काय तर पदवीधर झाल्यावर बँकेत नोकरी करायची. बँकेची वेळ संपली की दुसऱ्या

दिवशी पर्यंत तिच्याशी संबंध नाही. अशा व्यक्तीने पुढे जाऊन Sky is the limit म्हणावं असं यश मिळवलं, व सर्वांनाच अचंबित केले. M.Sc. Agri झाल्यावर दोन वर्षे धारवाड Agri कॉलेजमध्ये नोकरी केली. नंतर केंद्र शासनाने Agricultural Research Service हे केंद्र सुरू केले होते. तेथे श्री. यतींद्र यांनी अर्ज केला. त्यांची एक परीक्षा होती. ही परीक्षा IAS, IFS, Forest Service, Revenue Service या परीक्षे सारखी असते. ती यांनी दिली व यतींद्र यांची निवड झाली. त्यांचे पोस्टिंग केरळ, कर्नाटक, गोवा अशा ठिकाणी झाले. कर्नाटकातले विठ्ठल हे गाव मंगलोर पासून 50 किलोमीटर अंतरावर होते. जेथे नारळ, सुपारी, मसाल्याचे पदार्थ होतात. अशा ठिकाणीच बदल्या व्हायच्या. कृषी संशोधन केंद्रे ही वरील राज्यातील खेडेगावातच असायची. या नोकरीत त्यांनी दहा वर्षे काढली.

हैदराबादमध्ये क्रॉप रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये दोन वर्षे काम केले. पण एकंदरीतच यतींद्र यांचे मन शेती संशोधन नोकरीत रमेना.

B.Sc. Agri झाल्यावर त्यांनी पंजाबमध्ये फॉर्म सुपरिटेंडेंट म्हणून काम केले. त्यांच्या मित्राचाच हा फॉर्म होता. तुला रस असेल तर तू हे काम कर असे मित्राने सांगितले. या फॉर्मवर ते सकाळी सहा म्हशींचे दूधही काढायचे. तेथे दोन वर्षे अनुभव घेतल्यावर मग त्यांनी M.SC. केले. हैदराबाद मधील क्रॉप रिसर्च इन्स्टिट्यूट ही जगप्रसिद्ध आहे. येथील कामही Editing शी संबंधित होते. पण येथूनच आधी त्यांनी टेरी ही संस्था जॉईन केली. टेरी या संस्थेचे मुख्य काम हवा बदल या विषयावर आहे. ते खूप प्रसिद्ध आहे. डॉ. पचौरी हे I.P.C.C. या संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांनी टेरी ही संस्था स्थापन केली. त्या संस्थेला नोबेल प्राईजही मिळाले होते. त्यावेळी

डॉ. पचौरी हेच अध्यक्ष होते. तेव्हा त्यांनीच ते नोबेल प्राईज स्विकारलं. डॉ. पचौरी यांनीच यतींद्र यांना तू एडिटर हो असे सुचविले होते.

संशोधक संशोधन करतात. त्यावर प्रबंध लिहितात. पण सादरीकरणात ते कमी पडतात. त्यामुळे नियतकालिके तो स्विकारत नाहीत. त्यामुळे चांगले संशोधन प्रसिद्ध होऊ शकत नाही. अशा लोकांना Editor मदत करतात.

फिलीपाईन्स येथे या विषयावर एक कोर्स होता. चार महिन्यांचा तो यांनी पूर्ण केला. मुंबईला पुस्तके प्रसिद्ध करणारी "भारतीय विद्या भवन" ही एक संस्था. यांचा ही एक कोर्स टपालद्वारे श्री. यतींद्र यांनी पूर्ण केला.

त्यामुळे डॉ. पचौरे यांनी त्यांना दिल्लीला बोलावलं. श्री. नेने साहेब जे ICRISAT चे Deputy Director General होते. त्यांनी रिटायर्ड झाल्यावर एक मासिक काढले होते. त्याचे नाव होते इंडियन ॲग्री हिस्ट्री. त्यांना यतींद्र यांचे एडिटिंग चे काम खूप आवडलेले असल्यामुळे या मासिकाचे व त्यांनी लिहिलेल्या अनेक पुस्तकांचे Editing चे काम यतींद्र यांनाच दिले.

डॉ. पचौरी यांना यतींद्र यांचं Editing चे काम आवडलेलं असल्यामुळे ते जेव्हा Planning कमिशनच्या एका मोठ्या संस्थेच्या कमिटीवर असतांना त्या कमिटीचा जो अहवाल होता त्याचे कॉपी एडिटिंग यतींद्र यांनीच करावे अशी त्यांची खास इच्छा होती.

दिल्लीची ही टेरी संस्था खूप मोठी होती. 1000 लोक तेथे काम करीत होते. एकंदरीत दिल्लीला स्थायिक होणे यतींद्र यांचेसाठी जरा अवघड होते. यतींद्र हे शोधक दृष्टीचे आहेत. दिल्लीच्या संस्थेप्रमाणेच काम करणारी एक संस्था पुण्यातही

आहे. हे त्यांना कळले. पुण्याची संस्था लहान होती. त्यामुळे कामही कमी होते. परिसंवाद, प्रशिक्षण याच्यात मदत करण्याबद्दल त्यांना ऑफर आली. पण त्यांनी ते काम नाकारले. पुण्याच्या संस्थेत काम थोडेच असल्यामुळे ते कमी वेळात संपायचे. त्यामुळे घरी बसूनच काम करण्याचे त्यांनी ठरविले. संशोधकांचे नियतकालिकामध्ये लेख यायचे. पण ते Edit करण्यासाठी त्यांना यतींद्र यांच्यासारख्या व्यक्तीची गरज असायची. यतींद्र यांचे इंग्रजी उत्तम होते. अर्थात त्यांनी इंग्रजी भाषेचा अभ्यास स्वतःहून अधिक लक्ष घालून केला होता. इंग्रजी भाषा उत्तम अवगत येत असल्यामुळे संपादनाच्या कामात त्याचा भरपूर उपयोग झाला. संशोधकांचे लेख त्यांनी केलेल्या संशोधनावर असायचे पण त्या लेखांची शब्दरचना, मांडणी यामध्ये चुका असायच्या. नियतकालिके असा लेख स्विकारायला नाखुष असायचे. ते लेख यतींद्र यांच्या ईमेलवर यायचे. ते त्या लेखात योग्य त्या सुधारणा करायचे. त्यामुळे संशोधकांचे काम सोपे व्हायचे. यतींद्र यांना याचे पैसे मिळायचे. त्यामुळे आर्थिक नुकसान झाले नाही.

युरोपियन असोसिएशन ऑफ सायन्स एडिटर ही एक संस्था आहे. त्याचे सदस्यत्व हवे असेल तर त्याची वर्गणी इतरांनी भरायची. 3 वर्षांनी एकदा त्या संस्थेच्या परिषदेच्या कार्यकारिणीची निवडणूक व्हायची. ही निवडणूक लढवून यतींद्र त्या कार्यकारिणीवर निवडून आले. बाकीचे सर्व सदस्य युरोपियन होते. हे एकटेच भारतीय. श्री. यतींद्र यांचेकडे 6 वर्षे हे सदस्यत्व होते.

दिल्लीच्या संस्थेने एक विद्यापीठ सुरू केले. टेक्निकल लिहायचे कसे तेथे त्यांनी काम केले. तेथील नॅशनल केमिकल लॅबोरेटरीत P.H.D. करणारे विद्यार्थी असत. त्यांच्यासाठी काम केले.

थोडा वर्कशॉप थोडे काम असे चालू होते. शास्त्रीय प्रबंधाचं सादरीकरण कसं करावं याविषयी माहिती सांगण्यासाठी श्री. यतींद्र यांना परदेशी बोलावणं यायचं. हे कामही मोठं होतं. त्यामुळे परदेशी प्रवास झाला. तसेच भारतातही त्यांनी अनेक संस्था व युनिव्हर्सिटी मध्ये काम केलं. IIT कानपूर, IIT मुंबई, पुणे युनिव्हर्सिटी, बेंगलोर इत्यादी. यतींद्र यांच्या जवळ चांगली बुद्धिमत्ता आहे हे खरंच पण कुणाच्याही मदतीशिवाय त्यांनी स्वतःला आवडणारं काम प्रयत्नपूर्वक केलं. ते स्वतःच्या मनाने कुठे- कुठे अर्ज करायचे. पण त्यांच्या अर्जाला प्रत्येक वेळी चांगला प्रतिसाद मिळाला हे विशेष. स्वतःचे कर्तृत्व व त्याला नशिबाची साथ मिळत गेली.

श्री. यतींद्र यांनीही अनेक लेख लिहिले. अनेक पुस्तके Edit केली. स्वतःही एक पुस्तक लिहिले. ते खूप प्रसिद्ध पावले. ब्रिटनच्या एका प्रसिद्ध लेखकाने याचे खूप कौतुक केले.

आता इतक्या वर्षानंतर सुद्धा त्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीची लोक वाट पाहत आहेत. नार्वे युनिव्हर्सिटी तर्फे होणाऱ्या कोर्सेस मध्ये हे टेक्स्ट बुक म्हणून लावले आहे. या पुस्तकाचे नाव आहे communicating in style.

अमेरिकेत एक संस्था आहे. तुम्ही केलेले Editing चे काम त्यांना पाठवायचे. तीन परीक्षक असतात. प्रत्येक परीक्षकांने जर तुमच्या कामास 85% मार्क्स दिले तर तुम्ही त्या परीक्षेत यशस्वी झालात. श्री. यतींद्र हे याही परीक्षेत उत्तमरित्या यशस्वी झाले. आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपण काम करू शकतो याचे समाधान त्यांना मिळाले.

भारतातही अशा प्रकारची एक संस्था आहे. तेथेही ते उत्तम दर्जाचे काम करू शकतात.

इंग्रजी उत्तम बोलता येणं, लिहिता येणं, वाचलेलं समजून घेणे यासाठी त्यांनी केंब्रिज युनिव्हर्सिटीची परीक्षा दिली. C.A.F. हे सर्टिफिकेट मिळाले. श्री.यतींद्र यांचेकडे परदेशीय संशोधकांकडूनही Editing साठी लेख येतात.

युरोपियन असोशियन चे सदस्य असल्यामुळे त्यांच्या कामाला प्रसिद्धीही मिळाली.

घरी बसूनच ऑनलाईन हे सर्व काम ते करतात. जशी सवड असेल त्याप्रमाणे काम करतात. कुठल्याही बॉसचे बंधन नाही. प्रपंच चालवायला अर्थार्जन तर हवेच ते बऱ्यापैकी या कामातून त्यांना मिळते.

लहानपणापासूनच यांना चैन- ऐशो आराम या गोष्टींची नावड आहे. त्यामुळे गरजाही मर्यादित आहेत. स्वतःचे उत्तम काम हाच यांचा देव आहे. नशिबाला मात्र ते निश्चित मानतात. त्याची साथ नसेल तर आपल्या प्रयत्नाला यश येत नाही हे ते मान्य करतात.

वेग-वेगळ्या संस्थातून नोकरी करून Editing च्या कामात यतींद्र हे स्थिरावले आहेत. एक उत्तम Editor झाले. प्रसिद्धी मिळाली उत्तम नाव कमावलं. या कामाकरिता पुन्हा अलीकडेच इंग्लंड, रशिया, अमेरिका, मिडल इस्ट इकडे जाऊन आले.

शेतीची आवड यांना आहेच. संधी मिळाली तसे शेतीचे कामही त्यांनी केलेच. पुण्याला आल्यावर कामशेत येथील शेतीवर ते सल्लागार म्हणून काम करीत असत.

मित्राच्या फार्मवर दोन महिन्यातून एकदा जातात. यांनी आपल्या घरात बागही उत्तम केली आहे. संबंध भारतातून विविध वनस्पती गोळा करून आणल्या आहेत. त्या उत्तम रितीने वाढवल्या आहेत. फळांची झाडे, फुलझाडे, शेवग्याच्या शेंगा हे ही वाढवलं आहे.

यांचे आई- वडील, भाऊ-बहीण व पत्नी सुद्धा अत्यंत बुद्धिमान मंडळी आहेत. प्रत्येकाने आपण निवडलेल्या क्षेत्रात उत्तम यश संपादन केले आहे. अशी बुद्धिमान मंडळी एका कुटुंबात येणं मी तर म्हणेन ही तर ईश्वराचीच करणी!

# □ वसंतराव आपटे

आपले जग या साप्ताहिकामुळे श्री.वसंतराव यांच्याशी आम्हा उभयतांचा परिचय झाला. आपले जग बद्दलच्या प्रतिक्रिया माझे मिस्टर त्यांना कळवायचे. त्यामुळे माझ्या आधी ह्यांचाच परिचय वसंतरावांशी आधी झाला. मी पण आपले जग वाचायची पण श्री. वसंतराव यांच्याशी कधी बोलण्याचा योग आला नव्हता. हे होते तोपर्यंत श्री. वसंतराव यांचे येणे कागवाडला झाले नाही. तीन वर्षांपूर्वी मात्र ते आमच्याकडे माझ्या भावाबरोबर आले होते. तेव्हाच त्यांच्याशी प्रत्यक्ष अशा गप्पा झाल्या.

दोन वर्षांपूर्वी आलेल्या करोना संकटामुळे महिला मंडळाच्या माध्यमातून मी करीत असलेले सामाजिक काम मंदावले. त्यामुळे तरुणपणापासूनच असलेल्या लेखनाच्या आवडीने उचल खाल्ली. मी लिहू लागले.

सामाजिक कामामुळे ज्या लोकांशी माझा परिचय झाला ते लोक चाकोरीबाहेरील काम करणारे होते. त्यांच्यावर मी लेख लिहिले. त्या पुस्तकाचे नाव होते कर्मयोगी.

दुसरे पुस्तक मी माझे आत्मवृत्त लिहिले. तिसरे पुस्तक गुंफियेला शेला.

चौथे पुस्तक लिहित आहे. त्यात श्री. वसंतराव आपटे यांचेवर लेख लिहित आहे.

हे आपटे मूळचे सांगलीचेच. त्यांचे वडिल नोकरीच्या निमित्ताने किर्लोस्कर वाडीला गेले. आणि तेथेच स्थायिक झाले. जवळच त्यांनी 7- 8 एकर शेती घेतली. 1946 साली त्या शेतावरच ते रहायला गेले. शेतावर रहात असतांनाच 1949 साली श्री. वसंतरावांचा जन्म झाला. लहानपण बेताच्याच परिस्थितीत गेले. शेतापासून एक ते दिड किलोमीटर लांब किर्लोस्करवाडीला शाळा होती. लहानपणी ते शाळेला चालतच जात होते. अकरावीला मात्र ते पलूसच्या शाळेत जाऊ लागले. पलूसला असतांना शालांत परीक्षेत त्यांना गणित व संस्कृतमध्ये पहिले बक्षीस मिळाले. मेरिटमध्ये असूनही पुढील शिक्षणासाठी कॉलेजमध्ये जाणे जमले नाही. म्हणून त्यांनी शिक्षण सोडून दिले. व व्यवसाय सुरू केला. पण बाहेरून ते शिकत राहिले व पोस्ट ग्रॅज्युएट झाले.

P.H.D. च्या ही टर्म्स भरल्या. पण ते त्यांच्याकडून झाले नाही. मग 1966 ला त्यांनी हळू-हळू व्यवसाय सुरू केला. भांडवल तर नव्हतेच आणि उद्योग व्यवसायाची परंपरा पण नव्हतीच. प्रथम सिमेंट, पाईप वगैरे बांधकाम साहित्य विकण्याचा उद्योग सुरू केला. नंतर 1971 साली त्यांनी प्रिंटिंग प्रेस सुरू केला. आधी पासूनच त्यांना लेखन वाचनाची खूप आवड होती. तसेच लोकसंग्रहाची आवड होती. मग हळू-हळू लेखनाला त्यांनी सुरुवात केली. वृत्तपत्रांमध्ये लेख, बातम्या लिहू लागले. इकडे प्रेसच्या व्यवसायामध्येही त्यांनी उत्तम जम बसविला. त्यांचे काही नातेवाईकही या प्रेसमध्ये आले. नोकरही बरेच होते. नंतर त्यांना वाटायला लागले की लोक जागृतीसाठी, लोकशिक्षणासाठी वृत्तपत्र चालवावे. म्हणून त्यांनी आपले जग सुरू केले. त्यांचा भाचाही त्यांत होता. त्यांनाही लेखनाची आवड होती.

1973 साली हे साप्ताहिक सुरू केलं. त्यांनी आपले जग मधील लिखाण वैचारिक दर्जा सांभाळणारे आहे नां यावरच भर दिला. त्यामुळे त्यातील सर्व लेख दर्जेदार असत. लोकांनीहि त्याला उत्तम प्रतिसाद दिला. आर्थिकदृष्ट्या तसे ते तोट्यातच होते. कारण एकट्याच्या पाठबळावर ते चालवले होते. वर्गणीची सक्ती नाही. वाचक वर्षाला कधी 250 कधी 500 पाठवायचे. एखादे वेळी अंक आला नाही तर वाचक लगेच विचारणा करायचे. हा अंक भारतभर जायचा. अंक लहान पण ताकद मोठी होती. हे वृत्तपत्र चालवत असतांना त्यांचा अनेक संस्थांशी संबंध आला. दिल्लीचे वृत्तपत्र, हिंदुस्थान समाचार, तरुण भारत पुणे- सोलापूर व्यापारी मित्र इकडे ते लेखनहि करीत. त्या व्यतिरिक्त ग्राहक पंचायत, लुल्ला ट्रस्ट बरोबर काही सामाजिक काम, येराळा प्रोजेक्ट सोसायटी, पत्रकार संघातून काम, काही ग्रंथ, इतिहास लेखन केले. यानिमित्ताने ते देशभर हिंडले. उत्तम सत्संग लाभला. प्रचंड अनुभव मिळाला.

श्री. ना.बा. लेले हे पत्रकारितले गुरु. त्यांनी लिहिलेल्या एका पुस्तकाचे संपादन श्री. वसंतरावांनी केले. त्याचा प्रकाशन समारंभ आदरणीय वाजपेयी यांच्या दिल्लीतील घरी 150 - 200 लोकांच्या मेळाव्यात झाला. श्री. वसंतरावांचे भाग्य एवढे की वाजपेयींच्या समवेत त्यांना व्यासपीठावर बसायला मिळाले. हा अजब योग होता. तसेच श्री. यशवंतराव चव्हाण यांचे घरी त्यांच्या हॉलमध्ये बसून विविध विषयांवर गप्पा मारता आल्या. जसे काही वसंतराव त्यांचे मित्रच आहेत.

आदरणीय ग. प्र. प्रधान त्यांच्या घरी आले होते. श्री. धनाग्रे सर, स्वदेशी जागरण मंचचे श्री. राजीव दिक्षीत, तसेच ग्राहक पंचायतीचे बिंदू माधव जोशी, संघाचे श्रीकांत जोशी, कम्युनिस्ट पार्टीचे वा. बी. भट, आमदार अनिल बाबर, श्री.

आर. आर. पाटील, माननीय शरदजी पवार यांच्याशी कधी ना कधी भेटी झाल्या. व त्यांचेशी श्री. वसंतरावांना जवळीकही करता आली. माननीय शरद पवार संरक्षणमंत्री असतांना त्यांच्याबरोबर दिल्लीहून पुण्याला येण्याचा योग आला. हे सारे सुंदर योग त्यांच्या जीवनात आले. तसेच थोर साहित्यिक सुधीर मोघे, मुकुंदराव किर्लोस्कर, गं. ना. जोगळेकर, श्रीकांत मोघे यांच्याकडेही जाणे- येणे घडले. या लोकांचा इतका सहवास व जवळीक मिळाली की वसंतरावांना वाटतं आपण असं काय काम केलं. म्हणून या लोकांचा भाग्ययोग लाभला. श्री. वसंतरावांनी चालवलेलं आपले जग, त्यांनी इतर केलेले लेखन, सामाजिक काम समाज जाणून होता. तळमळीने करीत असलेले काम समाज जाणतोच. श्री. वसंतराव आपल्या कामाबद्दल फुशारकी मारीत नाहीत. हा त्यांचा विजय आहे. मोठ्या लोकांच्या ज्या गाठी-भेटी त्यांच्याशी झाल्या त्या निश्चितच त्यांच्या चांगल्या कामामुळेच झाल्या.

श्री. वसंतराव पुष्कळ खेडोपाडी हिंडले. ते मुळातच शेतावर राहूनच वाढले. त्यामुळे खेडोपाडी जाणे तेथील लोकांच्यात मिसळणे त्यांना सहजच वाटे.

अलिकडे वाढत्या वयामुळे व मुले आपापल्या उद्योगासाठी बाहेरगावी गेल्यामुळे श्री. वसंतरावांनी किर्लोस्करवाडीतील आपला पसारा आवरता घेतला. व त्यांच्या मूळ गावी म्हणजे सांगलीला शिफ्ट झाले. करोनामुळे दोन वर्षे त्यांना किर्लोस्करवाडीला जाता आले नाही. सध्या त्यांच्याकडे शिवाजी विद्यापीठाचा एक मोठा प्रकल्प जो शिवाजी महाराजांचावर आहे. तो चालू आहे. विटूयाचे सेंद्रिय विषयावरील मासिक, काही संपादनाची कामे, ग्रंथांची कामे हे चालू आहे. काही सहकारी त्यांना या कामात मदत करतात. थोडे काम ते बाहेरूनहि करून घेतात. श्री.

वसंतराव म्हणतात मला उत्तम सत्संग लाभला. सारे काही छान मजेत चालले आहे. यथाशक्ती करत रहायचं.

एकंदरीत त्यांच्या कामामुळे त्यांना खूप हिंडता आलं. अनुभव मिळाले. समाज बघायला मिळाला. त्यांचे लेखन किती झाले याचा एकदा त्यांनी सहज विचार केला तर पुस्तकाच्या आकाराची 6 ते 7 हजार पाने भरतील एवढे ते झाले होते. याबद्दल त्यांना स्वतःलाच आश्चर्य वाटते.

यांनी कधी कुठल्याही स्पर्धेत भाग घेतला नाही. एकदा त्यांना एका निवड समितीने पुरस्कार जाहीर केला होता. पण त्यांनी नम्रपणे पुरस्कार नाकारला. पुरस्कार घेण्याएवढे आपले काम नाही असे त्यांना वाटते. एकट्याने छान काम करीत रहावे असेच त्यांना वाटते. इतरांची सामाजिक कामे पाहता आपले काम खूप छोटे आहे असेच त्यांना वाटते. एकंदरीत त्यांनी एक रस्ता निवडला आहे व त्या रस्त्याने ते चालत राहिले आहेत. कुणाशी स्पर्धा नाही. तुलना नाही. आपल्या स्वभावाप्रमाणे ते या निवडलेल्या रस्त्याने आनंदाने चालले आहेत.

संसारामध्ये काही टक्के टोणपे आले. अपघात आले. उद्योगधंद्यामध्येही काही चमत्कारिक अनुभव आले. पण त्याकडे ते मागे वळून त्याची आठवण काढत बसत नाहीत.

गणित व विज्ञान हे आवडते विषय असल्यामुळे सर्व गोष्टीचा विचार ते तौलनिक दृष्ट्या करतात. कर्मकांड, देवधर्मावर फारशी श्रद्धा नाही.

शाळेत असतांना व्यासपीठावर जाणे याला ते घाबरत असत. त्यामुळे बक्षिस घेण्याच्या निमित्तानेही ते व्यासपीठावर गेले नाही. पण 1983 पासून त्यांना

व्यासपीठाचा इतका सराव झाला की विदर्भ सोडला तर सगळ्या महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ते व्याख्यानासाठी गेले आहेत. लोक आग्रहाने त्यांना बोलावतात आणि त्यांना ते आवडूही लागले.

सहकार खात्यात त्यांचे एक मित्र श्री. शिवाजीराव पाटील होते. त्यांच्याबरोबर वसंतराव विविध सहकारी सोसायट्यामध्ये गेले. त्यांचं काम पाहिलं. त्यांचा व्याप, त्यांचा पसारा वसंतराव सांभाळत असत. त्यामुळे त्यांचे हिंडणे खूप झाले. राजकीय लोकांचा परिचय झाला. या सर्वांचा एकत्रित विचार केला तर एकंदर त्यांच्या गाठी खूप मजेदार व उत्तम असा अनुभव आला. पुढील आयुष्य कुठलाही ताण-तणाव न घेता ते आनंदात जगणार आहेत. त्यासाठी त्यांना माझ्या अनेक शुभेच्छा!

# □ श्री. राम व सुनीता गोडबोले सच्चे कार्यकर्ते

श्री. राम गोडबोले हे साताऱ्याचे. माझ्या जाऊबाईंचे ते धाकटे बंधू. माझ्या दीरांच्या लग्नात ते आठवी इयत्तेत शिकत होते. तेव्हापासूनच मी त्यांना ओळखते आहे. त्यांचे सर्व शिक्षण साताऱ्यातच झाले. ते B.A.M.S. झाले व त्यांनी पुढे काय करावे याचा विचार त्यांच्या मनाने सुरू केला. त्यांचा पिंड सामाजिक कामाचा होता. डॉ. विकास आमटे यांचे काम ते पाहूनही आले. त्यांच्या कामातूनही त्यांना सामाजिक कामाची प्रेरणा मिळाली.

श्री. राम गोडबोले यांच्या आई शिक्षिका होत्या. त्या अतिशय सुस्वभावी होत्या. त्यांनी मुलांच्यावर उत्तम संस्कार केले होते.

श्री. राम पती-पत्नी हे चार वर्षे वनवासी कल्याण आश्रमाचेवतीने महाराष्ट्रातील आदिवासी साठीच काम करत होते.

1990 साली डॉ. राम यांचा विवाह सुनीताताईंशी झाला. कॉलेजमध्ये असतांनाच सुनीताताई अखिल भारतीय विद्यार्थी संघटनेशी जोडल्या गेल्या होत्या. त्यामुळे त्यांना अशा प्रकारच्या कामाची माहिती दिली जायची. त्यांना वनवासी कल्याण आश्रमाची माहिती होती. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्रात काम न करता बस्तर सारख्या ठिकाणी जायचे ठरविले. या दोघांचा विवाह 1990 साली झाला. विवाहानंतर लगेचच बस्तरला आले. तेथील आदिवासींसाठीच त्यांनी काम करायचे ठरविले. बस्तरमधील जंगली भागात राहणाऱ्या आदिवासींसाठी त्यांनी काम सुरू

केले. आरोग्याबाबत प्रचंड अनास्था, अज्ञान होते. शिक्षण, शोषण हे प्रश्न तेथे गंभीर होते. शहरी समाजाबद्दल त्यांच्या मनात भिती होती. या पती-पत्नींनी ती थोडीफार घालवली.

बस्तरला जेव्हा सुनीताताई प्रथम आल्या तेव्हा काही मुली त्यांच्या या कामाला जोडल्या गेल्या होत्या. 17 ते 24 वयोगटातल्या या मुली होत्या. त्यांना वनवासी कल्याणचे काम समजून घ्यायचे होते. त्यातील एक प्रमुख होती व तिने इतर मुलींना जोडून घेतले. बस्तर हा जिल्हा खूप मोठा आहे. सुनीताताईंना तो नविन होता. पण या मुलींच्यामुळे तो कळला. महाराष्ट्रातील वनवासी व येथील वनवासी यात थोडा फरक आहे. हे लोक सर्वस्वी दूर फेकले गेले आहेत. महिलांमध्ये सुद्धा शिक्षणाची खूप कमी आहे. येथे अनेक प्रश्न आहेत. त्याची तिव्रताही खूप मोठी आहे. अज्ञानामुळे ही माणसे शरीराला झालेल्या आजाराकडे खूप दुर्लक्ष करतात. एक महिला शुक्रवारी आपल्या आजारी मुलाला घेऊन डॉ. राम यांचेकडे आली होती. त्या मुलाला डायरिआ झालेला आहे असे ती सांगत होती. डॉक्टरांनी तिला इतरही काही गोष्टी विचारल्या. व त्याला नीट तपासण्यासाठी त्यांनी त्याला टेबलवर घेतले. त्याच्या डोक्याला गुंडाळलेले फडके काढले. तर डोक्यात एक जखम झालेली डॉक्टरांना दिसली. एवढेच नव्हे तर त्या जखमेत त्यांना किडे झालेले दिसले. ही गोष्ट 1992- 93 ची होती. ती बाई मुलाच्या जखमेबद्दल काहीच बोलत नव्हती. तर मुलाच्या आजारासाठी भगतकडे जाते असे सांगत होती. म्हणजे डॉक्टरांच्या औषधांपेक्षा त्यांचा मांत्रिकावरच प्रचंड विश्वास होता.

डॉक्टर सांगत होते त्यांच्या खाकरा मधील एका मुलीला कांजिण्या झाल्या होत्या. तिला औषध द्यावयाचे नाही असे कार्यकर्तेच म्हणत होते. हे तर अतिशय

धक्कादायकच होते. त्यामुळे कार्यकर्त्यांनाही ट्रेनिंग देणे आवश्यक झाले. तिला त्या लोकांनी कडुलिंबाच्या पाल्यावर झोपवले होते. पाच दिवसानंतर ताप उतरला. नंतर तो मांत्रिक आला त्याला जे काही हा-हू करायचे होते ते त्याने केले. आणि मग तिला अंघोळ घातली. पण डॉ. राम यांना त्या मुलीला औषध देऊ दिले नाही. त्यामुळे डॉक्टर अतिशय अस्वस्थ झाले. सुनीताताईंना तर त्यांची ही अस्वस्थता तळमळ बघवेना. पुढे सुनीताताईनी महिलांची छोटी- छोटी शिबिरे घेतली. आहाराबद्दलची माहिती त्यांना सुनीताताई सांगत असत.

या आदिवासी समाजात देवतांना महत्त्व आहे. देवतांचे मेळावे भरतात. तेथे असे एक देवस्थान आहे की त्या ठिकाणी देवतांनाही कोर्टात उभे केले जाते. किंवा गावात रोगराई आली देवांनी जर ती दूर केली नाही तर ही माणसे देवालाही शिक्षा करतात. त्यांना बाहेर ठेवले जाते. हा देव आपल्या कामाचा नाही असे वाटले तर ते त्याला डिबार करतात. पण पुन्हा जेव्हा त्यांना देव हवा असे वाटते त्यावेळी ते त्याला घेऊन येतात. आदिवासींची श्रद्धा देवाच्या आजूबाजूला जोडली गेली आहे.

जंगलातील आदिवासी यांची भाषा गोंडी आहे. वर्षा दीड वर्षात सुनीताताईंनी ती शिकून घेतली. ती बोलीभाषा त्याचा व्याकरणाशी काही संबंध नाही. ताईंनी मुलींसाठी वसतिगृह सुरू केले. तिथे लहान मोठ्या मुली होत्या. ताई गावात, बाजारात जायच्या. नुकताच तेथे नक्षलवाद्यांनी हल्ला केलेला असायचा. लोक त्यांना म्हणायचे तुम्ही जाऊ नका तिकडे. पण डॉक्टर पती-पत्नी म्हणायचे आम्ही सेवेच्या कामासाठी येथे आलो आहोत. आमचा इतर कशाशीही संबंध नाही. त्यामुळे आम्हाला कसलीच भिती वाटत नाही. खरंच चांगलं काम जो करत असतो नां त्याच्या पाठीशी भगवंत असतो हेच खरे!

बाजारात गेल्यावर मुली बाजारात जे विकायच्या म्हणजे मोहाची फुले, केळी वगैरे ते त्यांच्याकडून बळजबरीने ओढून घेतले जायचे. सुनीताताईंनी त्या मुलींच्या वर होणारी ही जबरदस्ती थांबवली! त्यांनी दाखवलेले हे धैर्य खूपच मोठे आहे.

डॉ. राम तेथील मुला-मुलींना आपले मेडिकल प्रोजेक्टचे काम समजावून सांगतात. ही मुले डॉक्टर जरी झाली नाहीत तरी ती चांगली कार्यकर्ती व्हावीत हे डॉक्टरांचे ध्येय आहे. बाहेरून येणाऱ्या कार्यकर्त्यांपेक्षा स्थानिक कार्यकर्ते तयार होणे फार महत्त्वाचे व जरुरीचे आहे. शहरातील डॉक्टरांच्या सहकार्याने आदिवासी मुला-मुलींनीच हे काम पुढे चालवायचं आहे. डॉ. राम सुरुवातीला सायकल वरून लोकांच्या घरी जाऊन त्यांना तपासून औषध द्यायचे. रस्ते अतिशय खराब असल्यामुळे मोटार सायकल वापरता यायची नाही. त्यांनी पहिल्यापासूनच ठरवले होते की कुणीही वनवासी असो किंवा आदिवासी असो बोलवायला आला तर नाही म्हणायचे नाही. त्याच्या घरी जायचेच. गाव दूर असले तरी ते जायचेच. पेशंटला तपासायचे औषध द्यायचे पण पैसे कधीही मागत नसत.

बस्तर म्हणजे छोटा भारतच आहे. सर्व राज्यातील लोक येथे आहेत. बस्तरमधील तीन जिल्ह्यात आता हे डॉक्टर पती-पत्नी काम करतात. तेथील बारसू या गावी त्यांचे मेडिकल सेंटर आहे. इकडे मुला- मुलींमध्ये Anaemia प्रचंड प्रमाणात आहे. याबाबत लोकांच्यात खूप अज्ञान आहे.

एकदा जंगलातील एक मुलगा फिट येऊन पडला. जवळच शेकोटी होती. त्यामुळे त्याचे निम्मे अंग भाजले होते. त्याला पडल्यामुळे जखमा झाल्या आणि गॅंगरीन झाले. पण जवळ-जवळ तीन महिन्यांनी त्या मुलाला उपचारासाठी डॉ. राम यांचेकडे आणले. त्याच्या शरीराला दुर्गंधी सुटली होती. कोणी हात लावायलाही

तयार नव्हते. कार्यकर्तेच म्हणाले चला डॉक्टर या मुलाचे ड्रेसिंग करायला हवे. त्याच्या जखमांचे ड्रेसिंग करून त्याच्यावर डॉ. राम यांनी उपचार केले. नंतर जंगलातून त्याला नारायणपूरला पाठवले. तो पूर्णपणे बरा झाला.

शहरातील डॉक्टर मंडळी अधून-मधून येतात. कॅम्प घेतात. मारिआ समाजाची मुले खूप सहनशील आहेत. विजेची उपलब्धता येथे कमी आहे. म्हणून डॉ. राम यांनी सौर विजेचाही प्रयत्न केला. मुलांना हा एक उद्योग व्हावा असे त्यांना वाटत होते पण तसे झाले नाही.

मेडिकल कॅम्प व आजारांचे फॉलोअप हेच डॉ. राम व त्यांच्या पत्नीचे येथील महत्त्वाचे काम आहे.

आदिवासी यांच्यात आरोग्याची जागृती करणे हे काम सोपे नाही. पण सामाजिक कामाची तळमळ असल्यामुळे साताऱ्यापासून इतक्या लांब असलेल्या छत्तीसगड येथे हे लोक गेले. 30 वर्षांपासून तेथे ते निष्ठेने काम करीत आहेत.

मरावे परी किर्ती रूपे उरावे! हे या दोघांच्या बाबतीत लागू पडणारे आहे. सर्वसामान्यांच्या प्रमाणे वैवाहिक जीवन न जगता दुर्लक्षित समाजासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले ते दोघे धन्य होत!

23 ऑगस्ट 2022 रोजी विश्रामबाग चित्पावन्न संघाच्या वतीने त्यांची प्रगट मुलाखत तेथे झाली. ती ऐकण्याचा योगही मला आला. त्यामुळेही ते उभयता करीत असलेल्या कार्याबद्दल मला लिहिता आले. डॉ. राम यांच्याबद्दल असे म्हणावेसे वाटते - जे कां रंजले गांजले, त्यासाठी म्हणे जो आपुले, तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा.

# □ उद्योजक श्री. प्रदीप ताम्हणे

26 जानेवारी 1950 साली प्रदीपजींचा जन्म दादर येथे झाला. वडील अतिशय शांत स्वभावाचे होते. श्री. प्रदीपजींना वडिलांचा लहानपणी कधीच मार बसला नाही. वडील पहिल्यांदा कोहिनूर मिलमध्ये अकाउंटंट होते. पुढे त्यांना वरची पोस्ट मिळाली. श्री. प्रदीपजींच्या आईचा संपर्क अनेक लोकांशी होता. त्या मुलांना नेहमी सांगत तुम्ही स्वतः काहीतरी करा. स्वतःची ओळख उत्तम काम करून मिळवा. एखादी कठीण गोष्ट कशी सोडवायची ते शिकून घ्या. त्यावर विचार करा. त्यांच्या आईने मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. आई-वडिलांच्या उत्तम संस्कारामुळे, स्वतःजवळ असलेल्या हुशारीमुळे या तीनही मुलांनी उत्तम मार्ग निवडले व त्यात चांगलेच यश मिळवले.

श्री. प्रदीपजींचं कुटुंब मध्यमवर्गीय होतं. त्यांचे शालेय शिक्षण एका मराठी माध्यम शाळेत झाले. मुळात हुशार असल्यामुळे शालेय जीवनात ते उत्तमरीत्या मार्क्स मिळवून यशस्वी झाले. महाविद्यालयीन शिक्षण सुद्धा त्यांनी उत्तम यश मिळवून पूर्ण केले. त्याच दरम्यान त्यांना एका कंपनीत नोकरी मिळाली. पगार होता फक्त 800 रु. त्यावेळी 800 रुपयाला ही खूप किंमत होती. मुळात त्यांना संशोधनाची आवड असल्यामुळे दुसऱ्या एका कंपनीत संशोधन आणि विकास विभागात कलर इन्चार्ज म्हणून नोकरी केली. काही काळानंतर औषधी गोळयांवरील रंगीत आवरण तयार करणाऱ्या एका अमेरिकन कंपनीत त्यांना नोकरी मिळाली. या कंपनीची शाखा लंडनमध्ये होती. तेथे प्रदीपजी काम करू लागले. उत्तम पगार, मर्सिडीज कार, राहण्यासाठी प्रशस्त बंगला अशा सगळया सुविधा होत्या. ही कंपनी मुख्यतः

रेडीमिक्स पावडर तयार करत असे. सुरुवातीला फक्त 13 किलो पावडर भारतात विकली जायची. मात्र प्रदीपजींच्या तंत्रज्ञानाने काही दिवसातच हे प्रमाण 5 हजार किलोवर गेले. भारतातील सर्वात मोठ्या 5 कंपन्यांना हेच तंत्रज्ञान पुरविले जाई. पण त्याची किंमत अफाट होती. 2500 रुपये किमतीची ही पावडर भारताला पंचवीस ते तीस हजार रुपयांना विकली जायची. इतकी मोठी तफावत असे. ही तफावत भारतातील कंपन्यांच्या लक्षात आली. प्रदीपजींच्या काही मित्रांनी याविषयी त्यांना सांगितलेही. पण झाले असे हे तंत्रज्ञान पुरविणारी ही एकमेव कंपनी होती. व तिचा बॉस एक अमेरिकन होता. ज्यांच्या समोर प्रदीपजींचं काहीही चालत नव्हतं.

प्रदीपजींनी शोधून काढलेल्या तंत्रज्ञानावर एके दिवशी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक देशातील औषध निर्मिती करणारे उत्पादक तंत्रज्ञ या व्याख्यानास आले होते. 45 मिनिटांचे ते व्याख्यान सर्वांना इतके आवडले की वेळेची मर्यादा नको तुम्ही बोला, असे सांगितले. व्याख्यानास उपस्थित असलेल्या लोकांनी प्रदीपजींना अनेक प्रश्न विचारले. बॉसने पण प्रदीपजींची तोंड भरून स्तुती केली. त्यामुळे हीच योग्य वेळ आहे असे हेरून प्रदीपजींनी भारतीय औषध कंपन्यांच्या किमती बाबतच्या व्यथा बॉसला सांगायचे ठरविले. व ते म्हणाले, आपण भारतातील कंपन्यांना आपलं कलर कोटिंगचं तंत्रज्ञान पुरवितो. पण त्याचा दर प्रचंड आहे. तो दर कमी असावा हे वाक्य पूर्ण होण्याच्या आधीच बॉस रागाने लाल झाला व जवळ-जवळ ओरडलाच. म्हणाला, तुम्हा भारतीयांना आमचं तंत्रज्ञान आम्ही सांगू त्या किमतीला घ्यावंच लागेल. हे वाक्य देशाबद्दल प्रेम, अभिमान असणाऱ्या प्रदीपजींच्या जिव्हारी लागलं. त्यांनी दोन मिनिटांचा अवधी मागितला व रिसेप्शनिस्टकडून कोरा कागद मागून घेतला. व एका ओळीत

राजीनामापत्र लिहिले. पण त्याचवेळी त्यांनी मनाशी एक निश्चय केला की भारतात जाऊन या अमेरिकन कंपनीला टक्कर देणारी स्वतःची कंपनी उभी करायचीच.

श्री. प्रदीपजी भारतात आले आणि घरच्यांच्या पाठिंब्याने अहोरात्र मेहनत घेऊन दीड महिन्यांच्या अथक संशोधनानंतर रेडीमिक्स पावडरचे तंत्रज्ञान विकसित केले. टॅबकोट या नावाने त्यांनी स्वतःची औषध निर्मिती कंपनी स्थापन केली. व स्वतः त्याचे मार्केटिंग केले. हे तंत्रज्ञान त्या अमेरिकन औषधाच्या तुलनेत 10 पटीने स्वस्त होते. बाजारपेठेत औषधी कंपन्यासोबत ओळख होतीच. त्यात त्यांच्या एका डॉक्टर मित्राने त्यांना पहिली ऑर्डर दिली. एवढ्या स्वस्तात संपूर्ण भारतीय बनावटीची ती रेडिमिक्स कोटिंग पावडर म्हणजे अविश्वसनीय बाब होती. श्री. प्रदीपजींनी डॉक्टरांची ऑर्डर पूर्ण केली. पहिल्याच वर्षी त्यांची दीड कोटी रुपयांची उलाढाल झाली.

1977 साली विनकोटस् कलर्स अँड कोटिंग प्रायव्हेट लिमिटेड नावाची नवीन कंपनी उभारली. अंबरनाथला कारखाना सुरू केला. आजही कंपनी जगातील 50 हून अधिक देशांमधील औषध निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना उत्पादन पुरविते.

मनुष्यबळाकडे प्रदीपजींचे विशेष लक्ष असते. कामगार हा कार्यक्षम रहावा यासाठी अंबरनाथ स्टेशन ते कारखाना असे कामगारांना ने आण करण्यासाठी रिक्षा सेना त्यांनी चालू केली होती. संध्याकाळी कामाची वेळ संपल्यावर कामगारांना एक मिनिटही थांबून घेतले जात नाही. त्याने आपला अधिक वेळ कुटुंबासमवेत घालवावा याकडे त्यांचा कटाक्ष असतो. एखादा कामगार अडचणीत असेल तर कंपनी त्याच्या मागे भक्कमपणे उभी राहते.

एकेकाळी पत्र्याच्या घरात राहणारे कामगार स्वतःच्या टू-बीएचके फ्लॅटमध्ये रहायला लागले. जवळपास प्रत्येकाकडे मोटार सायकल आहेच पण कारही आहे. श्री. प्रदीपजींच्या कंपनीत सध्या 55 कामगार काम करतात. पण त्यांची कार्यक्षमता 500 कामगारांच्या इतकी आहे. कामगारांना मिळत असलेल्या सुविधांमुळे ते मानसिक दृष्ट्या निश्चिंत असतात. त्यामुळे ते आपला पूर्ण वेळ कामाकडे देऊ शकतात. माझ्या दृष्टीने प्रदीपजींनी कामगारांप्रती जो दृष्टिकोन ठेवला तो अत्यंत स्तुत्य होय.

अत्यंत मृदू आवाज, मवाळ प्रकृतीचे प्रदीपजी भारतीय देशाभिमानामुळे पावडर कोटिंगमधील दुसऱ्या क्रमांकाच्या कंपनीची निर्मिती करू शकले. असे देशभक्त उद्योजक हे खऱ्या अर्थाने भारताचे नाव समृद्ध करीत आहेत.

आताच्या तरुण पिढीला श्री. प्रदीपजींचे कार्य प्रेरणादायी आहे. मी आजची तरुण पिढी पाहते आहे. उच्च शिक्षणासाठी ही मुले परदेशी जातात. शिक्षण पूर्ण करतात. तेथेच एखादी नोकरी पाहतात. कंपनीकडून चांगला पगार, इतर सुविधा मिळाल्या की ही मंडळी खुष! अरे, ज्या देशात तुम्ही जन्मला. पहिले शिक्षण जिथे घेतलेत. त्या देशासाठी तुमच्या शिक्षणाचा उपयोग करून द्या ना! आपल्या ज्ञानाचा उपयोग स्वतःच्या देशाला का करून देत नाही? भले तुम्हाला भारतात थोडा पैसा कमी मिळेल. पण भरपूर पैसा, सर्व सोयी-सुविधा यातच जीवनाचे सार्थक आहे असे का मानता?

भारतरत्न वीर सावरकर, टिळक आगरकर ज्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून आपले आयुष्य वेचले. त्यांचे स्मरण करा व तुमचे आयुष्य भारताचा विकास

व्हावा यासाठी वेचा. परदेशी गेलेल्या मुलांचे आई-वडील भारतात राहतात. आपल्याजवळ मुले- सुना नातवंडे नसल्यामुळे ते एकाकी पडतात. नातवंडांना आजी - आजोबांचे प्रेम, संस्कार मिळाले तर ती उत्तम नागरिक बनतात.

# □ कर्नल माधवराव व सौ.सुमती आठवले

गेल्या वर्षी म्हणजे 2021 सप्टेंबर मध्ये माझ्या नातीचे लग्न पुण्याच्या श्री. गौरव आठवले यांच्याशी झाले. सौ. सुमती व कर्नल माधवराव हे गौरवचे काका आजी व काका आजोबा आहेत. त्यामुळे नातीच्या लग्नात या दोघांशी परिचय झाला. पण या परिचयाचं हळूहळू मैत्रीत रूपांतर झालं. विचार जुळले की मैत्री होते. आणि ती नात्यापेक्षाही जवळची वाटते. आमचं दोघींचंही तसंच झालं. सुमतीताईंनी लग्नात माझ्याबरोबर फोटो काढून घेतला व वॉट्सऍप सुरू केलं. अधून- मधून फोनही करायच्या. मनमोकळ्या सुमतीताई फोनवर खूप काही सांगायच्या. त्यांना भरपूर बोलायला हवे आहे. माझी पण आवर्जून सर्व ती चौकशी करतात. मी सध्या माझ्या तिसऱ्या पुस्तकाचे लेखन पूर्ण करीत आणले आहे त्याबद्दल तर सतत चौकशी करतात.

अशा या ताई थोड्याच ओळखीत म्हणाल्या प्रत्येक स्त्रीला स्वतःची ओळख पाहिजे. कारण त्या कर्नल माधवरावांच्या जरी पत्नी असल्या तरी त्यांनी आपली ओळख स्वतःच्या कर्तृत्वाने निश्चितच निर्माण केली आहे.

आई वडिलांना एकुलत्या एक असलेल्या सुमतीताई लाडाकोडात वाढल्या. वडील रिझर्व बँकेत अकौटंट, दुसऱ्याचे दुःख ओळखणारे, अडचणीत असणाऱ्यांना मदत करणारे असे सज्जन गृहस्थ होते. आई रूपवान पण पुस्तकी शिक्षण फारसे न घेतलेल्या असूनही उत्तम

लेखन करायच्या. त्यांना माणसं जोडायला खूप आवडायचे. आई- वडिल दोघांनाही नाटके व गायनाची खूप आवड. सर्व दृष्टीने सुखी दाम्पत्य होते. आई- वडिलांनी सुमाताईंवर उत्तम संस्कार केले. लहानपणापासूनच त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण केली. आईप्रमाणेच सुमाताईही पाककुशल आहेत. स्वयंपाक करीत असतांना पदार्थांची रंगसंगती आणि चवीकडे विशेष लक्ष देत.

सुमाताईंना मराठी विषय विशेष आवडत असल्यामुळे त्या मराठी विषय घेऊन M.A. झाल्या. वाचनाची मुळातच आवड असल्यामुळे प्रसिद्ध लेखकांची पुष्कळ पुस्तके वाचली. वाचनाने प्रगल्भता येते हे त्यांना पटले होते. आईकडून आलेला कलेचा वारसा मुलीकडे आलाच होता. कॉलेजमध्ये शिकत असतांनाच त्या कृत्रिम फुले बनवायला शिकल्या होत्या. पण नोकरी करण्यास वडिलांची परवानगी नव्हती. पण प्रसंग पडला तर अर्थार्जन करता येईल एवढे शिक्षण त्यांनी घेतले. वरसंशोधन सुरू झाले. त्यांचे ठाम मत होते की आपण आर्मीत असलेल्या व्यक्तीशीच विवाह करायचा आहे. यांचे काही नातेवाईक संरक्षण दलात होते. खरंतर अशा लोकांचे जीवन सुरक्षित नसते. हे माहित असून सुद्धा त्यांनी कर्नल माधवराव आठवले यांच्याशी विवाह केला. कर्नल माधवराव हे उमदे, रुबाबदार, जीवन मूल्यांची जाणीव असणारे तडफदार इंजिनियअर होते.

उभयतांचा साखरपुडा अनंत चतुर्दशीला ठरला. पण सुट्टी न मिळाल्यामुळे माधवराव साखरपुड्याला येऊ शकले नाहीत व त्यांच्या फोटो सोबतच ताईंचा साखरपुडा झाला! असुरक्षितता, कोणत्या वेळी काय घडेल याची चुणूक ताईंना मिळाली! सैनिकाची पत्नी बनणं सोपं नाही हे त्या कळून चुकल्या. पण हतबल झाल्या नाहीत.

30 सप्टेंबर 1960 (दसरा) रोजी यांचा विवाह संपन्न झाला व तो तीन दिवस चालला. विवाहानंतर थोड्याच दिवसात हे दोघे कानपूरला गेले. तेथून कर्नल माधवराव दहा दिवसातच आपल्या कामावर म्हणजे झांशीला गेले. सौ. ताई कानपूरला थोडे दिवस राहिल्या. कारण कानपूरला त्यांची जाऊ व नणंद होत्या. पण नात्यापेक्षाही त्या जीवाभावाच्या मैत्रिणी झाल्या. व ती मैत्री आजपर्यंत टिकून राहिली आहे.

1961 जानेवारीत Family Quarters मिळाल्यावर दोघांचा घरसंसार सुरू झाला. आयुष्य म्हणजे जिग सॉ पझल! अनेक तुकड्यांनी भरलेले. सगळ्यांना समजून घेऊन हे पझल सोडवायचे असते. हे सुमाताईंनी अनुभवाने ओळखले. तेथे त्यांना दोन कन्यारत्न झाल्या. दोघीही देखण्या हुशार होत्या. पुढे जाऊन दोघींनीही उच्च शिक्षण घेतले. कर्नल साहेबांची बदली भारतातल्या अनेक मोठ्या शहरातून झाली. 3 वेळा युद्धात सक्रिय भाग घेतला. ठिकठिकाणच्या बदल्यामुळे त्यांना लष्करी डावपेच शिकावयास मिळाले. तसेच काही ठिकाणी लष्करी Cantonment बांधण्यासाठी त्यांचे Civil Engineering कामास आले. High Altitude साठी बनवलेले तंबू अजूनही वापरात आहेत.

सुमाताईंना वाचनाचे जबरदस्त वेड. अमराठी प्रांतातल्या वास्तव्यामुळे वाचनात खंड पडला. पण कर्नल साहेबांच्या निवृत्तीनंतर पुण्याला आल्यावर त्यांनी ही भूक खूपशी भागवून घेतली.

ताईंना फुलांचीही खूप आवड. ताज्या टवटवीत फुलांप्रमाणेच कृत्रिम फुलेही त्यांना आवडत. त्यामुळे ती फुले करायलाही त्या शिकल्या होत्या. या छंदाचे त्यांनी व्यवसायातही रूपांतर केले. याबाबतीतही श्री. माधवरावांनी त्यांना सर्व ती मदत केली. याव्यतिरिक्त योगासने, रेकी, तसेच मानसशास्त्रातील लहान-मोठे कोर्सेस, मुद्राविज्ञान, ऍक्युप्रेशर यात त्यांना प्राविण्यासह प्रशस्तीपत्रके मिळाली आहेत.

नोकरी निमित्त विविध जबाबदाऱ्या यांनी स्विकारल्या. दिल्लीत असतांना परदेशी पाहुण्यांसाठी Host म्हणूनची जबाबदारी अंगावर घेतली. जवानांच्या बायकांसाठी महिन्यातून दोनदा वेल्फेअर सेंटर चालविले. Army School मध्ये K.G. च्या प्रिन्सिपॉल म्हणून साडेचार वर्षे काम केले. जवानांच्या बायकांच्या अडीअडचणी विचारून त्या सोडविण्यासाठी सफल प्रयत्न केले. स्वतःची Identity निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या.

जवानांच्या बायकांच्या संपर्कात यांना नेहमीच रहावे लागे. कारण त्यांना त्यांच्या पायांवर उभे राहण्यासाठी शिकवायची जबाबदारी या ऑफीसर्स च्या बायकांवर असे. त्यासाठी कला, उद्योग, शिक्षण याचा वापर करावा लागायचा.

डिसेंबर 1971 मध्ये युद्धाची रणधुमश्चक्री सुरू झाली. ब्लॅक आऊट, विमानांची घरघर वर्तमानपत्रातल्या बातम्या, हॉस्पिटलमध्ये जखमी सैनिकांची भरती याचा त्यांनी अनुभव घेतला. श्री. माधवराव इंजिनिअर रेजिमेंट कमांड करीत होते. एक दिवस त्यांनी अचानक सांगितले की आमच्या रेजिमेंटला मोठ्या एक्सरसाईज साठी

जायचे आहे. कपड्याची पेटी तयार ठेव. केव्हा, कुठे, कधी काहीच माहित नाही. एक दिवस तर त्यांचे तिकडून ताईंना पत्र आले कदाचित माझे हे शेवटचेच पत्र असेल. सर्व कुटुंबीयांची काळजी घे. श्री. गोपाळकृष्णाची इच्छा असेल तर पुन्हा भेटूच! हे वाचून ताई पहिल्यांदा जरा हादरल्याच! पण त्यांनी मनाला समजावले की आपण लग्न एका वीराशी केले आहे. तेव्हा वीर पत्नी म्हणूनच मी जगेन व त्यांच्या उमेदींना साथ देईन.

या युद्धाचा समारोप तहामध्ये झाला! श्यामसुंदर मलीक यांना वीरमरण आले. सगळे हळूहळू परतले. श्री. माधवराव वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे थोडे उशिरा आले. पण या सर्वांच्या चेहऱ्यावर युद्धाचे पडसाद उमटले होते. काही सहकाऱ्यांना गमावल्यामुळे व काही जखमी झाल्यामुळे खिन्नता आली होती.

सैनिकी सेवेत असतांना सैनिक पत्नी म्हणून काही लिखित तर काही अलिखित भूमीका यांना वठवाव्या लागत होत्या. श्री. माधवरावांना सुद्धा काही वेळेस ताणतणावातून जावे लागे. परंतु त्यांच्या काही निश्चित मनोवृत्तीमुळे त्यांना त्यातून मार्ग काढता आला.

ठिकठिकाणी झालेल्या बदलीमुळे यांना भारतभ्रमण करता आले. शिवाय सुट्टीमध्ये या दोघांनी परदेशही पाहिला. श्री.  माधवराव व ताई यांनी रोज पाच किलोमीटर चालण्याचा व्यायाम कधीच सोडला नाही. त्यामुळे म्हातारपणीही दोघांची प्रकृती उत्तम राहिली.

Army तून निवृत्त झाल्यावरही यांनी 1993 पर्यंत Re-employment ची नोकरी केली. नंतर मात्र ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सभासद झाले व तेथे खूप चांगले काम केले.

श्री. माधवराव व त्यांचे भाऊ श्री. वसंतराव ही दोघेही जुळी भावंडे होती. जन्मतः वजनाने कमी पण पुढे सुदृढ प्रकृतीचे झाले. दिसण्यातही विलक्षण साम्य. दोघांनीही शिक्षण पूर्ण झाल्यावर आर्मीमध्येच जावयाचे ठरविले. व त्यांची निवड झालीही!

श्री. माधवरावांचे आई- वडिलही सुसंस्कृत. वडिल इंजिनीअर तर आई इंटर झालेल्या. मराठी, हिंदी व इंग्रजी या तिनही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. स्वतः शाकाहारी पण सुनेला नॉनव्हेज पदार्थ करायला शिकवले होते. सुमाताईंनी पाककलेत व इतर कलात जे प्राविण्य मिळवले त्याचे थोडे-फार श्रेय सासूबाईंकडेच जाते. सासुबाई एकदा त्यांना म्हणायला होत्या की माझी एक इच्छा आहे की तू पाच जणींना संसार साहित्य द्यावेस. ताईंनी हे मान्य केले व कोथरूड सोडून मुलगी-जावई यांच्याकडे रहायला जातांना आपल्या घरातील सर्व सामान अगदी कार-गाडी-स्कूटर सुद्धा गरजूंना देऊन टाकले. संसारातून मन काढून घेणे सोपे नसते. सुमाताईंचे सासरे इंजिनिअर असल्यामुळे फ्युज बदलणे, विजेच्या उपकरणात काही नादुरुस्ती झाल्यास ती कशी दुरुस्त करायचे हे शिकविले. माझ्या दृष्टीने तर त्या दोघांनीही ज्येष्ठ नागिकांसाठी जे काम केले ते फार महत्त्वाचे आहे. निवृत्तीनंतर सुध्दा आरामात जीवन न जगता वृद्धांच्या समस्या काय असतात, त्यांचे कौटुंबिक हितसंबंध, त्यांना सेवा सुविधा प्राप्त करून देण्यासाठी राज्यस्तरीय ठराव अशा अनेक चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्यावेळी पुण्यात फक्त सात ज्येष्ठ नागरिक संघ होते. पण श्री.

माधवरावांनी ज्येष्ठांच्या या चळवळीत भाग घेऊन ते 550 संघ स्थापू शकले. ज्येष्ठ नागरिक संघासाठी काम करतांना त्यांनी A.SCOP (मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संस्था) स्थापन केली. 7 वर्षे कार्यकारी अध्यक्ष म्हणून काम केले. याच्या व्यतिरिक्त काही ज्येष्ठ नागरिक घराचे प्रश्न घेऊन यांच्याकडे येतात. तेव्हा त्यांचे प्रश्न ऐकून घेऊन त्यांचे समुपदेशन करतात. त्या कुटुंबाशी नंतर देखील अधून मधून संपर्क ठेवतात. काही ज्येष्ठांना जागेवरून हलता येत नाही काही अंथरुणावरच असतात. घरात माणसं असून एकाकी असतात. घरच्या तरुणाईला वाटतं त्यांचे जेवण-खाण-औषध-पाणी व्यवस्थित केलं की झालं. त्यांच्याशी थोडा वेळ का होईना संवाद करावा हे घरच्या तरुणाईच्या लक्षातच येत नाही. त्यामुळे हे वृद्ध एकाकी पडतात. अशांच्या काही घरी श्री. माधवराव आठवड्यातून एकदा तरी जातात. त्या वृद्धांशी गप्पा मारतात. त्यांची विचारपूस करतात. त्यांचे काही काम असेल म्हणजे औषध आणणे, त्यांचे एखादे पत्र लिहिणे, त्यांना फळे आणून देणे अशी कामे हसतमुखाने सहज करतात. जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा, हे श्री. माधवराव व त्यांच्या पत्नीबाबत अगदी लागू पडते.

प्रत्येक व्यक्ती प्रपंच उत्तम करण्यासाठी धडपडते. पण या गृहस्थाश्रमातून बाहेर येऊन समाजासाठी काहीतरी करावे ही जाणीव, ही तळमळ फार थोड्या जणांच्याकडे असते. सौ. सुमतीताई एका सैनिकाची पत्नी म्हणून उत्तम जीवन जगल्या. त्यांना आवडत असलेले बागकाम, विणकाम, उत्तम पाककृती करणे हे त्यांनी केलेच पण त्याचबरोबर पतीबरोबर ज्येष्ठ नागरिक संघाचेही काम केले. कोथरूड ज्येष्ठ नागरिक संघटनेचे उपाध्यक्षपदही सांभाळले. पती आर्मीत असतांना मोठ्या पदावर ते काम करत असतांना या पण पत्नी म्हणून ज्या जबाबदाऱ्या

त्यांच्यावर आल्या त्या उत्तम रितीने पार पाडल्या. निवृत्तीनंतरचे आयुष्य सुद्धा सुखा समाधानात राहून पतीच्या ज्येष्ठांच्या कार्यात तितकीच मदत केली. कुठेच कमी पडल्या नाहीत.  इतकी अनुरूप जोडी विरळाच असते.

खरा तो एकचि धर्म जगाला प्रेम अर्पावे! हेच त्यांनी केले. त्यांच्या या यशस्वी जीवन कार्याबद्दल त्यांना माझे कोटी- कोटी प्रणाम!

# □ श्री. समर्थांनी सांगितलेले प्रपंचाचे व वेळेचे व्यवस्थापन.

श्री.समर्थांचेकाळी समाजाची परिस्थिती अजिबात चांगली नव्हती. लोक अत्यंत आळसावलेले होते. प्रपंची माणूस आहे त्या परिस्थितीतून वर येण्याची आकांक्षा करीतच नव्हता.अशा समाजाला प्रयत्नवादी बनविणे अत्यंत जरुरीचे होते. समाजाची मरगळ नाहीशी करण्यासाठी एखादा जाणकार पुढारी त्याच्या तत्वज्ञानासहित समाजाला हवा होता. हे कार्य श्रीसमर्थांनी केले. खरंतर त्यांना समाजाला परमार्थाकडे वळवायचे होते. पण प्रपंची माणूस एकदम परमार्थाकडे वळणे अशक्यच आहे. हे त्यांनी ओळखले होते. स्वतः प्रपंच न करता त्यांनी प्रपंची माणसाला तो कसा करावा, प्रपंच करीत असतांना दिनचर्या कशी असावी, वेळेचे नियोजन कसे करावे, हे सारे दासबोधासारख्या ग्रंथात त्यांनी विशद केले आहे. आपल्याकडे अनेक संत होऊन गेले. त्यांनी आपल्याला भगवंताची भक्ती कशी करावी व कां करावी हे सांगितले. पण श्रीसमर्थ हे सर्व संताहून वेगळे संत आहेत. ऐहिक सुखासाठी मनुष्य आधी प्रपंच करणारच हे त्यांनी जाणले होते.

बहुतां जन्मांचा सेवट। नरदेह सांपडे अवचट| येथे वर्तावे चोखट नीति न्याये ।

प्रपंच करावा नेमक। परंमार्थ विवेक| जेणेकरिता उभय लोक संतुष्ट होती.

आळसाचे फळ रोकडे। जांभया देऊन निद्रा पडे । सुख म्हणौन आवडे। आळसी लोका ।।

साक्षेप करितां कष्टती। परंतु सुरवाडती । खाती जेविती सूखी होती । यत्नेकरुनी।

आळस उदास नागवणा| आळस प्रयत्न बुडवणा |

आळंसे करंट पणाच्या खुणा। प्रगटीं होती। ।

म्हणोनी आळस नसावा| तरीच पाविजे वैभवा ।

अरत्री परत्री जीवा | समाधान |

प्रेत्न करावा तो कोण| हेचि ऐका निरूपण।

सावध करून अंतःकरण | निमिष्य येक ।

प्रातःकाळी उठावे | कांही पाठांतर करावे |

येथानशक्ति आठवावे । सर्वोत्तमासी ।

मग दिशेकडे जावे । जे कोणासिच नव्हे ठावे ।

शौच्य आचमन करावे | निर्मळ जळे |

मुखमार्जन प्रातःस्नान | संध्या तर्पण देवतार्चना| पुढे वैश्यदेवउपासन | येथासांग| काही फलाहार घ्यावा मग संसार धंदा करावा | सुशब्दे राजी राखावा | सकळ लोक|

ज्या ज्याचा व्यापार | तेथे असावे खबर्दार ।। दुश्चिंतपणे तरी पोर | वेढा लावी |

चुके ठके विसरे सांडी | आठवण जालिया चर्फडी |

दुश्चित आळसाची रोकडी | प्रचित पाहा ।।

या कारणे सावधान | येकाग्र असावे मन | तरी मग जेवितां भोजन | गोड वाटे |

पुढे भोजन जालियांवरी | काही वाची| चर्चा करी |

येकांती जाऊन विवरी | नाना ग्रंथ |

तरीच प्राणी शाहाणा होतो । नाहीतरी मूर्खचि राहतो

लोक खाती आपण पाहतो । दैन्यवाणा ।

म्हणून ते प्रपंची मांणसाला वरील श्लोकांत म्हणतात अरे प्रपंच जरूर कर पण तो नेटका कर. जाणतेपणाने कर. पहाटे उठा थोडे पाठांतर करा पण आधी थोडी मागील उजळणी करा, असे सांगून प्रातः र्विधीसाठी दूर जा. जातांना हे कुणालाही कळू देऊ नका. व येतांना रिकाम्या हाताने न येता काहीतरी घेऊन या म्हणजे हा येण्या-जाण्याचा वेळही व्यर्थ जाऊ नये ही त्यांची शिकवण. आल्यावर स्नान संध्या करून फलाहार करा. त्यांनी नाश्ता सांगितलेलाच नाही! म्हणजे फलाहार हाच शरीराच्या आरोग्यासाठी उत्तम आहे हे संतही सांगतात. श्रीसमर्थ स्वतः रोज 120 सूर्यनमस्कार घालीत. फलाहारा बरोबर व्यायामही पण आवश्यक गोष्ट आहे हे बालोपासनेत त्यांनी सांगितले आहे. एवढे झाल्यावर वरील श्लोकात ते सांगतात प्रत्येकाने नंतर आपल्या कार्याकडे वळावे. तो करीत असतांना अजिबात आळस करू नये. तो खबरदारीने करावा. कुणाचाही रोष ओढवून घेऊ नये. नोकरी, व्यवसाय चोखपणे करायला हवा. दुपारच्या भोजनानंतर आळसावून न बसता काही धार्मिक गोष्टींचे वाचन करावे. चर्चा करावी अशाने मनुष्य शहाणा होतो.

लेकुरे उदंड जाली | तो ते लक्ष्मी निघोन गेली | बापड़ी भिकेसी लागली काही खाया मिळेना| दिवसे दिवस खर्च वाढला | यावा होता तो खुंटोनी गेला ते म्हणतात अधिक मुले होऊ देऊ नका. त्यामुळे त्यांच्या पालनपोषणासाठी अधिक पैसा मिळवावा लागेल. व तो न मिळाल्यास दारिद्र्य येईल. सातशे वर्षापूर्वी मुलं

होण्याच्या बाबतीत श्रीसमर्थांचे विचार इतके पुढारलेले होते. भोजनाबाबत ते सांगतात, भोजन झाल्यावर जर अन्न उरले तर ते लगेच गोरगरीबांना देऊन टाका. त्यांना पण ताजे अन्न खायला मिळेल. अन्न वाया घालवणे हां धर्म नव्हे.

प्रपंची जो सावधान | तो परमार्थ करील जाण | प्रपंची जो अप्रमाण। तो परमार्थी खोटा

सुखी असतो खबर्दार | दुःखी होतो बेखबर |

ऐसा हा लौकिक विचार | दिसतचि आहे |

मानवी जीवनात प्रपंच व परमार्थ एकमेकांना पूरक असतात. म्हणून सर्वसाधारण माणसाने प्रपंच नीटपणे सांभाळून परमार्थ करावा किंवा परमार्थ टाकून प्रपंच करणे दोनीही दोषमय आहेत. म्हणून प्रपंच व परमार्थ समांतर चालविण्यांमध्ये जीवनाची रम्यता आढळते.

श्रीसमर्थ प्रयत्नाला फार महत्व देतात. यत्न तो  देव जाणावा, असे ते नेहमी सांगतात. आळशी माणसाल वैभव प्राप्त होत नाही. आरंभी उद्योग करतांना कष्ट होतात पण त्याचे सुख कालांतराने मिळतेच. उद्योगी माणूस चांगले खातो- पितो व सुखाने जगतो. आपला संपूर्ण दिवस तो प्रपंच व परमार्थ यात व्यतीत करतो.

प्रयत्नाला तर श्रीसमर्थ अतिशय महत्व देतात. अचुक यत्न करवेना। म्हणौन केले ते सजेना | आपला अवगुण जाणवेना | काही केल्या आपण योग्य दिशेने प्रयत्न करीत नाही त्यामुळे आपल्याला हवे ते मिळत नाही.

विवेकाने दूरदृष्टि येते. दूरदृष्टि वापरून पुढे येणाऱ्या प्रसंगांसाठी आधीच तरतूद करून ठेवावी. स्वतः कष्ट करून पैसा मिळवावा. कुणाचेही फुकटं खाऊ नये. आपला प्रत्येक क्षण हा कामाला लावायचा आहे. ते म्हणतात वडिलांनी मिळवलेलेही खाऊ नका.

कर्म, भक्ति व ज्ञान यांचा समन्वय जो साधतो त्याला संपूर्ण समाधान लाभते व ते कायम टिकते. म्हणून समर्थ म्हणतात.

आधी प्रपंच करावा नेटका | मग घ्यावे परमार्थ विवेका | येथे आळस करू नका | विवेकी हो | श्री समर्थांचे मन, मनगटव मेंदू या तीनही गोष्टीवर विशेष भर होता.

माणसाच्या प्रपंचाचे नियोजन, वेळेचे नियोजन याला त्यांनी महत्व दिले आहे. जो माणूस प्रपंच -नेटका करतो तोच परमार्थही करू

शकतो. त्यामुळे वेळ वाया दवडू नका असे ते वरचेवर सांगतात.

# □ श्री. सुधीर गद्रे

श्री. सुधीर गद्रे पुणे यांच्याशी ओळख माझी मैत्रीण सौ. स्वातीताई वर्तक यांच्यामुळे झाली. माझ्या पुस्तकातून मी चाकोरीबाहेरील काही विशेष काम ज्यांनी केले आहे त्या व्यक्तींचा परिचय करून देत असते. स्वातीताई पण मला अशा व्यक्तींचा परिचय करून देत असतात. श्री. सुधीर गद्रे हे त्यांचेच मावसदीर ते पुण्याला असतात. टाटा मोटर्स मध्ये ते इंजिनिअर होते. निवृत्तीनंतर मुळातच संगीताची आवड असल्यामुळे त्यांनी एक उत्तम काम संगीतावर केले. तत्पूर्वी त्यांना हा संगीताचा वारसा आईकडून मिळाला त्या आदरणीय मंदाताई गद्रे यांचे जीवन चरित्र पाहूया. मंदाताईंचा जन्म बडोदे येथील जोशी घराण्यात 1919 साली झाला. त्याकाळी संगीत शिक्षणाला समाजात प्रतिष्ठा नव्हती. नाटक, संगीत क्षेत्र हे कुलीन घरातील लोकांचं काम नाही अशी धरणा होती. त्यामुळे आवड असूनही मंदाताईंचा गाण्याशी संबंध म्हणजे त्याकाळी देशप्रेम जागृत करण्यासाठी जे मेळे भरविले जात त्यात गाणे म्हणणे एवढाच सहभाग होता.

मंदाताईंचे यजमानही कै. विश्वनाथ हे अतिशय मनमोकळया उदार स्वभावाचे, सर्वांना मदत करणारे, वाईटातही चांगले शोधणारे, प्रथम दुसऱ्याला महत्त्व देणारे असे होते. त्यामुळे त्यांच्या सहवासात आलेली व्यक्ती त्यांच्याशी लगेच जोडली जायची. त्यांच्या या स्वभावामुळे मंदाताईंची संगीताबद्दलची ओढ व जाण त्यांनी ओळखली व त्यांना पं. बाबूराव गोखले यांच्या महाराष्ट्र संगीत विद्यालयात पाठविले. तेथे त्यांचे रीतसर शास्त्रीय संगीताचे शिक्षण सुरू झालं व लवकरच गांधर्व महाविद्यालयाची संगीत विशारद ही पदवी त्यांनी मिळवली. त्यानंतर संगीताचं प्रगत

शिक्षण मास्टर नवरंग यांच्याकडे सुरू केलं व  त्यांच्याकडे जवळ- जवळ 25 वर्षे शिकून भेंडीबाजार घराण्याची गायकी आत्मसात केली. तसेच 1942 ते 1972 या काळात मुंबईत आकाशवाणी केंद्रावर त्यांनी प्रथम सुगम संगीत व नंतर शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम केले. एकदा रविवारीच होणाऱ्या राष्ट्रीय संगीत कार्यक्रमांमध्ये पुणे आकाशवाणी केंद्रावरून गायन सादर करायचा मान त्यांना मिळाला होता.

संगीत शिक्षण व तीस वर्षे आकाशवाणीवरून गाणे यात त्यांना त्यांच्या यजमानांचे सहकार्य खूपच लाभले. त्यांच्या साथीमुळे त्या आपले गाणे टिकवू शकल्या. जीवनात योग्य साथीदार मिळणे हे खरोखरच भाग्याचे आहे! मंदाताईंनी शास्त्रीय संगीतात एवढे प्राविण्य मिळविले पण त्यांनी स्वतःच्या संसाराकडे कधीही दुर्लक्ष केले नाही. नवरा- बायको दोघांनी मिळून कौटुंबिक जबाबदाऱ्या उत्तम तऱ्हेनेसांभाळून दोन्ही मुलांचेवर चांगले संस्कार केले.

उभयतांना 52 वर्षांचे सुखा- समाधानाचे सहजीवन लाभले.

श्री. सुधीर गद्रे यांनी टाटा मोटर्स मधून निवृत्त झाल्यावर आई-वडिलांची स्मृती सायबर विश्वात कायमस्वरूपी रहावी म्हणून “स्वर मंदाकिनी” ही वेबसाईट निर्माण केली. त्यांनी आपल्या गाण्याची आवड या मार्गाने जोपासली.

पूर्वी शास्त्रीय संगीताचा आनंद घेण्यासाठी प्रत्यक्ष मैफिली ऐकणे हाच एक मार्ग होता. विसाव्या शतकात संगीत ऐकण्यासाठी विविध साधने उपलब्ध झाली. ध्वनीमुद्रिका, कॅसेट, सी.डी., डी.व्ही.डी. वगैरे दूरदर्शन आले आणि संगीत आणखी घरोघरी पोहचले. काही गायक व वादक यांनी भारतीय संगीत जगातील इतर देशातही पोहचवलं. पण जेव्हा संगणक व इंटरनेट आलं तेव्हा भारतीय संगीत

विश्वाच्या कानाकोपऱ्यापर्यंत गेले. अनेक साधनाद्वारे कंठ संगीत ऐकायला मिळायचे ते काही ठराविक घराण्याच्या गायकांद्वारे मिळायचे. भेंडीबाजार घराण्याचा उदय हा इतर घराण्यांपेक्षा बराच उशिरा झाला. नंतर बरीच वर्षे हे घराणे अज्ञातवासातच होते. पण पुढे काही शिष्यांनी व संगीत प्रेमींनी भेंडीबाजार घराण्याची संमेलने आयोजित केली. भेंडीबाजार घराण्याच्या गायकीमधील इतर अंगाबरोबरच उत्कृष्ट कल्पनावैभव, अलंकारिक व लयबद्ध शब्द योजना व रागानुरुप स्वररचना यांनी नटलेल्या बंदिशी हे प्रमुख वैशिष्ट्य आहे. उस्ताद अमान अलीखा यांनी 400 च्या वर बंदीशी बांधल्या होत्या असे म्हणतात.

इंटरनेटवर भेंडीबाजार घराण्याच्या बुजुर्गांची सविस्तर माहिती उपलब्ध व्हावी, काही बुजुर्गांच्या गायनाचे जे थोडे ध्वनिमुद्रण खाजगीरित्या उपलब्ध आहे त्याद्वारे गायकीची वैशिष्ट्ये सर्वांपर्यंत पोहोचावी व उस्ताद अमान अली खॉ व इतर शिष्यांनी रचलेल्या व साहित्य, सूर व लय यांची भावपूर्ण गुंफण असलेल्या व अमर, अमरपिया अमरदास या उपनामांनी युक्त असलेल्या जास्तीत जास्त बंदिशी इंटरनेटद्वारे प्रसिद्धीस याव्यात व हा अमूल्य ठेवा आज व भविष्यातही रसिकांपर्यंत व विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत रहावा या उद्देशाने या वेबसाईटची निर्मिती केली आहे.

स्वर मंदाकिनी (swaramandakini.com) ही वेबसाईट श्री. सुधीर गद्रे यांनी आई- वडिलांची स्मृती, त्यांचे अप्रत्यक्ष स्मारक सायबर विश्वात उभारावं या कल्पनेने निर्माण केली आहे. आई-वडिलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांची आठवण इंटरनेटवर चिरंतन रहावी या उद्देशाने त्यांनी ही साईट निर्माण करून आपल्या थोर आई-वडिलांना अर्पण केली आहे.

तसेच दुसरे संकेतस्थळ पहा या संकेतस्थळावर 1800 रागांची माहिती मिळते. श्री. सुधीर गद्रे यांनी www.oceanofragas.com हे ससंकेस्थळ विकसित केले. यामध्ये 500 रागांचे स्वरूप कळावे यासाठी MP3 प्रकारच्या ऑडिओ फाइल्सचा समावेश असून इंटरनेटवर उपलब्ध असलेला दृक-श्राव्य स्वरूपातील रागकोश तयार केला आहे. रागांची माहिती देणारी पुस्तके आपल्याकडे अनेक उपलब्ध आहेत. काही संकेतस्थळावर प्रचलित रागांची माहिती उपलब्ध आहे. परंतु अनवट रागांची माहिती शोधू इच्छिणाऱ्या अभ्यासकांना त्रास होतो. माहिती मिळाली तरी रागाचे स्वरूप कळायला तो राग प्रथितयश गायकांकडून समजून घ्यावा लागतो. म्हणून काही प्रमाणात या अडचणी दूर कराव्यात या उद्देशाने हे संकेतस्थळ गद्रे यांनी विकसित केले आहे.

बाराशे रागांचा डेटाबेस आणि सहाशे रागांच्या ऑडिओ उपलब्ध करून देणारी ही ओशन ऑफ रागाज् म्हणजे संगीत प्रेमींसाठी एक खजिनाच आहे.

खरोखर श्री. सुधीर गद्रे यांनी केलेले हे काम खूप कौतुकास्पद, अभिनंदनीय आहे. प्रचलित व अप्रचलित रागांचा संग्रह करण्याचा त्यांना छंद होता. पण या छंदाला त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली हे खूप महत्त्वाचे.

प्रचलित रागापासून ते मैफलीमध्ये सहसा न गायले गेलेले अप्रचलित असलेले दुर्मिळ राग या वेबसाईटमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. कुठलाही राग नष्ट

होऊ नये व पुढील पिढ्यांपर्यंत हे भारतीय संगीत पोहचावं या उत्कट भावनेमुळे त्यांनी हे काम अत्यंत तळमळीने केले.

त्यांनी आपला 25 वर्षांचा संग्रह वेबसाईटवर आणला त्याला दीड वर्ष लागलं. त्यांचंही संगीताचं शिक्षण झाले आहे. पण नोकरीमुळे गाण्याला ते वेळ देऊ शकत नसत. त्यामुळे त्यांना स्वतःचे गाणे पुढे नेता आले नाही. निदान गाण्याच्या सतत सहवासात तरी रहावे म्हणून ते संग्रह करू लागले. माहिती जमा केली. ऑडिओ क्लिप्स जमवल्या. एवढी सगळी माहिती मिळवलेली त्याचा आनंद इतरांनाही मिळावा या विचाराने त्यांना ही वेबसाईटची कल्पना सुचली.

रागाचे स्वरूप कळावे यासाठी लिखित माहिती बरोबरच त्याच्या ऑडिओ क्लिप्स टाकण्यात आल्या आहेत. या क्लिप्स मधून रागाच्या स्वरूपाची कल्पना येऊ शकते. काही राग गायकांनी गायले आहेत, तर काही राग वाद्यांच्या माध्यमातून मांडण्यात आले आहेत. या साईटवर सर्च व्हील आहे. तिथे सॉफ्टवेअरच्या मदतीने आद्याक्षर, नावं, स्वरसंख्या, मेलकर्ता, रागांग थाट, रागसमय, रागाचे स्वर अशा आठ पर्यायांच्या सहाय्याने राग शोधता येतात. याशिवाय रागांची शास्त्रीय माहिती पाहता येते. आणि त्यांची झलक ऐकायला मिळते. वेगवेगळे राग ऐकले जावेत म्हणून राग ऑफ द मंथ असा एक उपक्रम या साईटवर चालवला जातो.

पंडित भातखंडे यांनी सुमारे वर्षांपूर्वी भरवलेल्या राष्ट्रीय संगीत संमेलनाचे वृत्तांत, तसेच त्यांनी लिहिलेल्या पण आता दुर्मिळ असलेल्या 30 पुस्तकांच्या पी.डी.एफ. कॉपीज अभ्यासकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत.

ज्या रागांच्या ऑडिओ क्लिप्स मिळाल्या नाहीत त्यांची यादीही त्यांनी दिली आहे.

भारतीय संगीताची ही साईट अधिकाधिक परिपूर्ण करण्यासाठी त्यांनी लोकांनाही आवाहन केले आहे की ज्यांच्याजवळ अशा काही दुर्मिळ ऑडिओ रेकॉर्डिंग असतील तर त्यांनी या साईटवर समाविष्ट कराव्यात.

या संकेतस्थळाला आतापर्यंत 30 देशांतील 100000 हून जास्त संगीत प्रेमींनी भेट दिली असून oceanofragas याच नावाने प्ले स्टोअरवर अँड्रॉइड ऍप या स्वरूपात सुद्धा उपलब्ध आहे.

श्री. सुधीर गद्रे यांच्या या कामाबद्दल त्यांचे कितीही कौतुक व अभिनंदन केले तरी ते कमीच आहे. खरंतर त्यांच्या या कामासाठी सरकारने त्यांना पुरस्काराने सन्मानित करायला हवे असे मनापासून वाटते.

त्यांची मला भावलेली एक गोष्ट अशी की त्यांच्या आईचे माहेरचे नांव इंदुमती होते. त्यांना पुस्तकात या नावाचा राग सापडला. पण तो कुणी गायलेला मिळाला नाही. म्हणून त्यांनी तो स्वतःच गायला व मला त्याची ऑडिओ क्लिप पाठवली आहे. ती क्लिप संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. संगीतावरील व आई वरील त्यांचे हे नितांत प्रेम! या दोन्हीसाठी त्यांना माझे मनापासून वंदन!

# □ डॉ. वसुधा आपटे (शव चिकित्सक)

डॉ. वसुधा आपटे यांचा जन्म पुण्याचा. आई वडिल अतिशय सुसंस्कृत! न्या. माधवराव रानडे हे वसुधा ताईंचे पणजोबा. डॉक्टर वसुधा ताईंचे वडिल रानडे यांचे घरीच लहानाचे मोठे झाले. त्यामुळे वडिलांचेवर न्यायमूर्तींनी व रमाबाईंनी उत्तम संस्कार केले. आदरणीय रमाबाईंनी स्त्री शिक्षणासाठी मोलाचे कार्य केले. त्यावेळी स्त्रियांना चूल आणि मूल एवढे क्षेत्र होते. रमाबाईचे मुळेच स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.

आदरणीय रमाबाईंच्या संस्कारामुळेच वसुधाताईंचे वडिलांवर स्त्री- पुरुष समानतेचे संस्कार झाले.

डॉ. वसुधाताईंना वडिल सतत प्रोत्साहन द्यायचे. शाळा, कॉलेजमध्ये शिकत असतांना वक्तृत्व स्पर्धेत भाग घे. स्वतः भाषण तयार कर. त्यात आवश्यक असेल तरच मी सुधारणा करून देईन. विविध खेळात भाग घे. अशा वडिलांच्या प्रोत्साहनामुळे अभ्यासाव्यतिरिक्त इतर गोष्टीतही वसुधाताई हिरीरीने भाग घेऊ लागल्या. त्यामुळे त्यांच्यात धीटपणा आला. वक्तृत्व, संगीत, खेळ यामध्ये त्यांनी प्राविण्य मिळवले.

ताईंचे कॉलेज शिक्षण मुंबईला झाले. त्या M.B.B.S. झाल्या. व एंटरनशिप करीत असतांना नेत्र विज्ञानाची एक स्पर्धा परीक्षा होती. त्यात वसुधाताई पहिल्या आल्या होत्या. त्यामुळे सगळयांना वाटले या नेत्र विशारद होतील. ताईंना सर्जरीमध्ये

पण उत्तम गुण होते. M.B.B.S. झाल्यावर त्यांचा विवाह झाला. कुटुंबाची जबाबदारी, लहान मुलांचे संगोपन हे करीत असतांनाच त्यांनी M.D. व L.L.B. केले. अभ्यासासाठी त्यांना रात्री जागावे लागायचे. घरच्यांच्या सहकार्यामुळेच त्या हे शिक्षण पूर्ण करू शकल्या. त्यांचे सर्व शिक्षण मुंबईच्या नायर हॉस्पिटलच्या टोपीवाला कॉलेजमध्ये झाले. त्यांनी L.L.B. ला न्यायवैद्यक हा विषय घेतला होता. मुंबई विद्यापीठाद्वारे न्यायवैद्यकीय ही परीक्षा नव्याने सुरू झालेली होती. खरंतर त्यावेळी शिकणाऱ्या स्त्रियांच्या मध्ये असा एक मतप्रवाह होता की डॉक्टर होणारी महिला ही स्त्री रोग तज्ज्ञ किंवा लहान मुलांचे डॉक्टर होणे हे निवडते. पण वसुधाताईंना वेगळं काहीतरी करायचं होतं. म्हणून त्यांनी हे क्षेत्र निवडलं. शिवाय यांच्या रक्तात पिढीजात कायद्याच्या ज्ञानाची परंपरा होती हे ही असेल. 125 वर्षात या पहिल्या न्याय वैद्यकशास्त्र हे क्षेत्र निवडून त्यात कार्य केलेल्या या पहिल्या महिला होत.

घरापासून नायर हॉस्पिटलला त्या बसने जात असत. पण ह्या ही वेळेचा त्या सदुपयोग करून घेत. त्यांनी छोट्या डायऱ्या आपल्यापाशी ठेवल्या होत्या. त्या डायरीत अभ्यासासंबंधी काही नोट्स असायच्या. त्याचे मनन त्या प्रवासात करीत. ड्यूटी संपवून घरी येतांना त्यांना घराचे वेध लागत.

घरातील सर्वांचे सहकार्य त्यांना लाभले होते. त्या रहात असलेल्या इमारतीमध्ये खालच्या मजल्यावर वसुधा ताईंचे आई-वडिल रहात होते. त्यामुळे वसुधा ताईंच्या लहानग्या दोनही मुलांना वसुधाताई हॉस्पिटलला गेल्यावर आई-वडील नातवंडाचा छान सांभाळ करीत. छोटा मुलगा केवळ दीड महिन्याचा असल्यापासून वसुधाताई कामावर जायला लागल्या. आजी आजोबांचे उत्तम संस्कार मुलांचेवर झाले.

आजोबा तर आदरणीय रमाबाई रानडे यांच्या घरी वाढले होते ते निष्णात वकील होते.

डॉ. वसुधाताईंचे आजोबाही वकील व न्यायमूर्ती रानडे हे तर होतेच. शिवाय वसुधाताई ही न्याय वैद्यकशास्त्राच्या पदवीधर. ताईंच्या पाच पिढ्या मुंबई विद्यापीठातून पदवीधर झाल्या.

पहिल्यांदा जेव्हा करोनर रजेवर जायचे तेव्हाच ताईंना त्या जागेवर काम करायला लागायचे.

सकाळी 9 ते 4 || अशी त्यांच्या ड्यूटीची वेळ असायची. शिकविण्याची उत्तम हातोटी असल्यामुळे त्या नायर हॉस्पिटलच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काम करायच्या. 65 व्या वर्षापर्यंत त्या मेडिकलच्या मुलांना शिक्षण देत होत्या. त्या मुलांना सांगायच्या जे शिक्षण घ्याल ते मनापासून व प्रामाणिकपणे घ्या तरच फायदा होईल.

मुंबई व सुरत या दोन ठिकाणी त्यांनी काम केलं. सुरत येथील डिपार्टमेंट पोस्ट ग्रॅज्युएशन पर्यंत डेव्हलप करून दिलं. त्याशिवाय शिक्षक आणि वैद्यकीय शिक्षण कसे द्यावे याच्या कार्यशाळा घेतल्या.

ताईंनी न्यायवैद्यक असतांनाचा एक अनुभव सांगितला. नायर हॉस्पिटलमध्ये काम करीत असतांना एके दिवशी या नेहमीप्रमाणे ड्यूटीवर जाण्यासाठी हॉस्पिटलच्या गेटपाशी आल्या. तर दोन पोलीस ऑफिसर गेटपाशी उभे  होते. ते म्हणाले - मॅडम आम्ही तुमचीच वाट पहात आहोत. काम असे आहे 27 मृतदेह त्यांची शवचिकित्सा व्हावी म्हणून आणले आहेत.

ताईंनी व त्यांच्या एका सहकाऱ्यांनी मिळून सकाळी दहा पासून संध्याकाळी सहा पर्यंत न थांबता शवांची अतिशय काळजीपूर्वक चिकित्सा केली. त्यांनी मध्ये विश्रांतीही घेतली नाही. एक रायटर मात्र घेतला होता. प्रत्येक शवाच्या चिकित्सेनंतर त्यांनी काढलेला निष्कर्ष त्या रायटरला सांगायच्या तो ते सर्व लिहायचा.

ताई या कामास शव विच्छेदन म्हणत नाहीत तर शवचिकित्सा म्हणतात. मेडिकलच्या पहिल्या वर्षाला असतांना अभ्यासासाठी म्हणून मृतदेहाचे शवविच्छेदन त्यांना करावे लागे. तो अभ्यास सर्व अवयवांसाठी असे.

मृतदेहाबद्दल यांना पूर्णपणे आदर असतो. एका शवाच्या चिकित्सेचा अनुभव दुसरे शव चिकित्सा करतांना उपयोगी पडतो. नंतर कोर्टात जाऊन साक्ष द्यावी लागते. सर्व शवांच्या बाबतीत कोर्टात जावे लागत नाही. काही नैसर्गिकच असतात. कुठे पडलेले मृतदेह असतात ते दवाखान्यात आणले जातात. ज्यावेळी क्रिमिनल केस असते, पोलिसांशी संबंध येतो तेव्हा कोर्टात खूप वेळ जावे लागते.

हॉस्पिटलमध्ये सुद्धा यांना न्यायाचे काम करावे लागते. बालमजुरांना कारखान्यात लहान वयात काम करावे लागते. अशावेळी त्यांचे वय निश्चित करण्याचे काम हॉस्पिटलच्या न्यायाच्या कामात येते. एखादा स्मृतिभ्रंश झालेली व्यक्ती तिला स्वतःबद्दल काहीच माहिती सांगता येत नाही अशावेळी सुद्धा त्यांचं वय ठरविणे हे या न्यायवैद्यकीय कामात येते.

महाराष्ट्रात बलात्कार प्रकरणे वाढली आहेत. त्यांची तपासणी करणे हे ही न्याय वैद्यकीय कामात येते.

विषमज्वर झालेला रुग्ण आला तर त्याचे विष कशा स्वरूपाचे आहे हे तपासायला फॉरेन्सिक डॉक्टरांना बोलावलं जातं.

पुरून टाकलेला मृतदेह पण आणला जातो. पण त्याचीही शव चिकित्सा ताई करतात. सडलेल्या मृतदेहाची चिकित्सा अवघड असते. त्यांच्या हाडावरून ही चिकित्सा केली जाते.

ताई म्हणतात मी माझे व्यक्तिमत्व असे तयार केले आहे की कुठलाही राजकीय दबाव माझे वर आला नाही.

काळा कोट व पांढरा कोट याचा समन्वय यांनी साधलेला आहे. डेप्युटी करोनर म्हणून याच पहिल्या महिला आहेत.

ताईंची प्रतिमा अतिशय स्वच्छ असल्यामुळे यांच्या निवृत्तीनंतरही यांच्या हाताखाली काम केलेले सुद्धा स्वच्छ प्रतिमेचे राहिले आहेत.

विषारी दारू पिऊन 120 रुग्णांचा मृत्यू झाला होता. त्यातील बऱ्याच शवांच्या चिकित्सा वसुधाताईंनी केल्या होत्या.

त्या म्हणतात मृताच्या नातेवाईकाची आम्ही अतिशय कदर करतो. त्यांच्या भावना जाणून शव जास्तीत जास्त लवकर नातेवाईकांना देण्याचा प्रयत्न करतो.

न्यायवैद्यक शास्त्राचा उद्देश हा आहे की अपराध्याला शिक्षा व्हायला हवी व निरपराधाला शिक्षा होऊ नये. त्याची मुक्तता व्हावी. बलात्कार झालेल्या स्त्रीच्या बाबतीत जो गुन्हेगार पकडला जातो त्याच्या रक्ताच्या तपासणीवरून तोच गुन्हेगार आहे का ते ठरविलं जातं.

फॉरेन्सिक लॅब मोठी असते. J.J. हॉस्पिटलची लॅब मोठी होती. आता ठिकठिकाणी या लॅब झालेल्या आहेत. फॉरेन्सिक मेडिसिन मधले डॉक्टर हे M.B.B.S., M.D. असतात. तेच शवचिकित्सा करतात. पण लॅब मधले लोक हे B.Sc., M.Sc. झालेले असतात. वेगवेगळे Expert असतात. महत्त्वाचे काम तेथे केले जाते.

शवचिकीत्सा करणाऱ्या डॉक्टरांना कुठल्याही दबावाला बळी न पडता कोर्टात साक्ष द्यावी लागते.

डॉ. वसुधाताईंनी दोन पुस्तकेही लिहिली आहेत. त्यांनी काही चांगले छंदही जोपासले आहेत. त्यांना फुलपाखरांचा छंद आहे. कारण फुलपाखरे ही मूर्तिमंत चैतन्य व सुंदरतेचे प्रतीक आहेत. त्यांचं जगणं हे क्षणभंगुर असून सुद्धा परागवहनाचे काम ते उत्तम रितीने करतात. अशा प्रकारचे जीवन आपल्यालाही जगता आले पाहिजे असे ताईंना वाटते.

अनेक वेळा मृतदेह हाताळल्यामुळे ताईंना मृत्यूबद्दल भीती वाटत नाही. तो अटळच आहे. त्यामुळे वाट्याला आलेले जीवन चांगले रितीने जगले पाहिजे. केवळ स्वतःचा विचार न करता इतरांनाही आपला उपयोग करून द्यायला हवा व जीवन ही आनंदयात्रा ठरावी असे ताईंना वाटते.

ताईंनी गावोगावी प्रबोधनपर व्याख्याने दिली आहेत. महिला दिनी यांचा सत्कार व मुलाखत झाली. त्यावेळी त्या म्हणतात महिलांना मी शुभेच्छा देईनच. पण पुरुषांना आजच्या महिला दिनी अधिक शुभेच्छा देते. कारण स्त्रीला सुरक्षा देणं, तिचा आत्मसन्मान करणं, तिला स्वातंत्र्य देणं हे त्यांनी केले पाहिजे. स्त्रियांवर होणारे

अत्याचार पुरुषांनी थांबविले पाहिजेत. शिवाजी महाराजांची जी शिकवणूक होती की प्रत्येक परस्त्रीला मातेसमान माना, तिला आदर द्या, तिची सुरक्षितता पहा ही शिकवणूक पुरुषांनी अंगीकारली पाहिजे हे त्या आवर्जून सांगतात.

डॉ. वसुधाताईंना त्यांच्या या कामाबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत. राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते लिडिंग लेडी अवॉर्ड, वुमन ऑफ द मिलेनियम अवॉर्ड, सह्याद्री वाहिनी तर्फे हिरकणी पुरस्कार, झी मराठीचा उंच माझा झोका पुरस्कार, वुमन ऑफ द इयर अवॉर्ड, नोबेल एशियन अवॉर्ड इत्यादी.

अमेरिका अथवा लंडनला न जाता भारत देशातच राहून देशवासीयांची जी सेवा त्यांनी केली त्याला तोड नाही. यापेक्षा दुसरा कर्मयोग काय असू शकतो? त्यांना शतशः धन्यवाद!

# □ सौ. नीलाताई खरे

सासरच्या सौ. नीलाताई खरे या माहेरच्या मिस जॉकोबेथ मार्क. बडोद्यात वडिलांचा ट्रॅव्हल एजन्सीचा व्यवसाय होता. नीलाताईंचं हायस्कूल, कॉलेजचे शिक्षण बडोद्यात झाले. बडोद्यात असतांनाच यांची श्री. धनंजय खरे यांच्याशी ओळख झाली व परिचयाचे रूपांतर विवाहात झालं. श्री.धनंजय खरे यांचा बडोद्यात व्यवसाय होता. त्यांचे वडिल आर्मी मधून कर्नल म्हणून निवृत्त झाले. श्री. धनंजय खरे यांच्या व्यवसायाला पुण्यात अधिक संधी आहेत असं त्यांना कळलं. म्हणून ही सर्व मंडळी बडोद्याहून पुण्याला शिफ्ट झाली.

पुण्याला आल्यावर काही दिवस यांनी काहीच केले नाही. पण आतील उर्मी स्वस्थ बसू देईना म्हणून त्यांनी एक क्लब जॉइन केला. रोटरी प्रमाणेच तो एक क्लब होता. या क्लब चा सॅनिटरी नॅपकिनचा एक प्रोजेक्ट होता. पण तो फारसा व्यवस्थित नव्हता. नॅपकिन तयार करण्याची त्यांची पद्धती नीलाताईंना योग्य वाटली नाही. त्यामुळे त्यांनी यामध्ये लक्ष घालण्याचे ठरविले. हे प्रोजेक्ट जर व्यवस्थित केले तर चांगले होईल व हे प्रोजेक्ट मोठे झाल्यास ते अनेक महिलांपर्यंत जाईल. अनेक स्त्रियांना रोजगार मिळेल. सौ. नीलाताईंनी या प्रोजेक्टसाठी फलटण जवळील आशु हे गाव निवडले. व तेथे त्यांनी या प्रोजेक्टवर काम सुरू केले. हे गाव खेडेगाव असल्यामुळे बायका शेतात कामाला जायच्या. तिथे त्यांनी पंधरा ते सोळा बायकांचे इंटरव्ह्यु घेतले. त्या बायकांना मशीन बद्दल काहीच माहिती नव्हती. त्यामुळे

पहिल्यांदा हे पॅड हाताने बनवले जायचे. पण पुढे जाऊन मशीनवर ऑटोमॅटिक ते बनवले जाऊ लागले. सौ. नीलाताईंनी सहा बायका निवडल्या. व त्यांना नोकरीवर ठेवले. सकाळी 10 ते 6 ही नोकरीची वेळ ठरली. व रोज एका महिलेला त्या 180 रुपये पगार द्यायच्या. फलटण येथील श्री. शिवरूप राज निंबाळकर यांनी सौ. नीलाताईंना या कामासाठी जागा दिली. ती जागा ताईंनी दुरुस्त करून घेतली. तेथे बायकांसाठी संडास बाथरूम बांधले व काम सुरू झाले.

हे काम मार्च 2021 मध्ये सुरू झाले. पण तेवढ्यात करोना आला. लॉकडाऊन सुरू झाले. ताईंनी पॅड तर पुष्कळच तयार केले होते. आता हे पॅड कसे खपणार हा प्रश्न उभा राहिला. पण फेसबुक पेजवरून ताईंना कळलं की स्वयंसेवी संस्था खूप आहेत. त्या हे सॅनिटरी पॅड घेऊ शकतील. मग ताईनी फेसबुकवर हा पॅडचा मेसेज टाकला. काही सामाजिक संस्थांनी फेसबुक वर असाही मेसेज टाकला होता की हे सॅनिटरी पॅड आम्ही अवश्य घेऊ व ते महिलांना आम्ही फुकट देऊ. ताईंनी त्यांच्याशी संपर्क केला व आपल्या प्रोजेक्टची सर्व माहिती सांगितली. हे पॅड पूर्णपणे नैसर्गिक आहेत. त्यात कुठल्याही केमिकलचा वापर नाही. शिवाय कॉटन बरोबर यात प्लास्टिकचा वापर नाही. त्यामुळे वापरल्यानंतर मातीत छोटा खड्डा करून त्यात ते टाकून वर माती टाकल्यास ते सहजपणे मातीत मिसळून जातात. खरोखर ही माहिती अतिशय महत्त्वाची आहे. शिवाय बाहेर औषधी दुकानात ज्या किमतीला हे पॅड्स मिळतात त्या किमतीत ताईंनी ते लोकांना उपलब्ध करून दिले आहेत.

आजकाल असे कळते की बाहेर उपलब्ध होणाऱ्या सॅनिटरी पॅड्समध्ये केमिकल्सचा वापर केलेला असतो. हे केमिकल्स महिलांच्या आरोग्यास हानिकारक आहेत. तेव्हा याचा विचार काळजीपूर्वक करायला हवा.

पूर्वी विशेषतः खेड्यात पाळीचे वेळी कापडाचाच उपयोग बायका करीत असत. पण हा कपडा स्वच्छ धुऊन कडक उन्हात वाळवणे अतिशय जरुरीचे असते. पण ते महिला करीत नाही. त्यामुळे ही आरोग्याला धोका होतोच. त्यामुळे नीलाताई बायकांना कापड का नको हे समजावून सांगायच्या. त्या बायकांना म्हणायच्या रोज एक रुपया बाजूला टाका. आम्ही 28 रुपये प्रमाणे हे पॅड्सचे पाकीट देऊ. इतरही याबाबतीतील माहिती त्या महिलांना द्यायच्या. शाळेत जाऊन मुलींमध्ये यांनी या संबंधात जागृती केली. एकंदरीतच मासिक पाळीत स्वच्छता कशी पाळावी, मन आनंदी कसे ठेवावे हे ही त्या सांगायच्या.

सौ.नीलाताई या B.Com. झालेल्या आहेत. लहानपणापासूनच पॉकेट मनीसाठी वडिलांकडे पैसे न मागता त्या स्वतःच कष्ट करून पैसे मिळवायच्या. वडिलांच्या ट्रॅव्हल एजन्सीचे ही काम करायच्या.

पुण्यात शिफ्ट झाल्यावर मात्र त्यांना सतत वाटायचे की आता दुसऱ्यासाठी काहीतरी करावे. आणि या तळमळीने त्यांनी हा सॅनिटरी पॅड्सचा प्रकल्प सुरू केला.

आतापर्यंत ताईंनी दोन लाख 50 हजार पॅड्सची विक्री केली आहे. हे पॅड्स राजस्थानातील खेड्यात गेले, बिहार, झारखंड, महाराष्ट्रात तर खूपच खपले. स्वयंसेवी संस्था ताईंच्या या प्रकल्पाला देणगी देतात. व त्या ते देणगीच्या प्रमाणात ताईंच्याकडून पॅड्स घेतात व ते फुकट वाटतात. बॉलीवूडचे डिरेक्टर्स, Actors मुंबईतील रेड डॉट संस्था, भारत विकास परिषद, बिहार मधील स्कूल ऑफ योगा रोटरी इनर व्हील इत्यादींनी हे पॅड्स देणगी देऊन घेतले. पण त्याचे वितरण मात्र फ्री ऑफ चार्ज केले.

महिलांच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी ताईंचे हे सामाजिक कार्य बहुमोल आहे. त्यासाठी त्यांना धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत.

# □ दोन पिढीतले अंतर

दोन पिढीत पडणारे अंतर हे पडणारच हे आपण जाणू शकतो. माझे आई-वडिल जे कष्ट करत होते तसे कष्ट मला माझ्या आयुष्यात पडले नाहीत. स्वयंपाक घरातील कामे न कंटाळता आई प्रसन्न चेहऱ्याने ती करायची. त्याकाळी मध्यमवर्गीयांच्याकडे धुण्याला, स्वयंपाकाला बाई नसायची. त्यामुळे आईसारख्या गृहिणींचा वेळ सगळा कामात जायचा. पण इतकं असूनही त्याकाळी माझी आई ठराविक वेळी रेडिओ आवडीने ऐकायची. रेडिओवरील बातम्या व वर्तमानपत्र ती आवडीने रोज वाचायची. म्हणजे देशात चाललेल्या घडामोडी तिला समजून घ्यायला हव्या असत. दिवसभराच्या कामाच्या रामरगाड्यात तिने आपला पुस्तके वाचण्याचा छंद कधीच सोडला नाही. पुस्तकी शिक्षण फारसे नसून सुद्धा ती वैचारिक दृष्ट्या कुठे कमी नव्हती. वडिल तर शिक्षणाने आर्किटेक्चर. वडिलांची एखादी गोष्ट आम्हा मुलींना पटली नसली तर ते म्हणायचे तुमचे म्हणणे मला पटवून द्या. त्यांना चर्चा करणे आवडायचे. त्यामुळे चर्चा करून आपली मते लहानपणापासूनच आम्ही बहिणी मांडायला शिकलो. हे वडिलांच्या संस्कारामुळेच आम्ही धीट बनलो. हा धीटपणा आम्हा बहिणींना पुढच्या आयुष्यात खूप उपयोगी पडला.

माझ्या पिढीची तरुण-मुले-मुली शिक्षण घेऊ लागली. अर्थार्जन करू लागली. कुटुंबाची आर्थिक जबाबदारी घेऊ लागली. त्यात ना कुठला अहंकार. हे आपण केले पाहिजे या जाणिवेने आम्ही ते करत होतो. लग्नानंतर अर्थार्जन करण्याची जरुरी

राहिली नाही. चांगली नोकरी मी का सोडू असे कधीच वाटले नाही. संसार उत्तम करणे हे महत्त्वाचे वाटायचे. मुलं घरची माणसं यांना जास्तीत जास्त वेळ देणे हेच आपले कर्तव्य आहे असे वाटायचे. त्यामुळे सर्वच कुटुंब आनंदी सुखी रहायचे. आईला संसाराचा गाडा ओढतांना जितके शारीरिक कष्ट करावे लागले तसे आम्हाला लागले नाहीत. माझ्या संसारात स्वयंपाक सोडून सर्व कामाला बायका आल्या. सासू-सासरे मुले नवरा बायको असे कुटुंब छान रहायचे. आम्हाला स्वातंत्र्य मिळत नाही सासू-सासऱ्यांची अडचण होते असे कधीच वाटायचे नाही. उलट त्यांनी माझ्या मुलांना सांभाळले. उत्तम कथा सांगून चांगले आदर्श त्यांच्यापुढे ठेवले. आई वडिलांचे प्रेम मिळणे हे जसे आवश्यक असते तितकेच प्रेम आजी-आजोबांचे मिळाले तर मुलांचे व्यक्तिमत्व उत्तम घडते.

प्रपंचा व्यतिरिक्त इतर सामाजिक कामे करायला सासू-सासरे घरी असल्यामुळे वेळ मिळायचा. नवऱ्याचा पाठिंबा, त्यांची अनेक प्रकारची मदत यामुळे मी बाहेर पडू शकले. व माझ्या कुवतीनुसार समाजासाठी काही ना काही करू शकले.

माझ्या पिढीच्या वेळी वस्त्रे, आभूषणे, चैनीच्या इतर गोष्टी खूप कमी मिळत. चार-पाच साड्यांच्या व्यतिरिक्त आणखी नसायच्या. त्याचा खेद कधीच वाटला नाही. घरी बनवलेले साधेच पण चविष्ट जेवण असायचे. गोड-धोड फक्त सणावारी! त्यामुळे त्याची अपूर्वाई वाटायची. घरच्या माणसांच्या बरोबर भांडण कधीच व्हायचे नाही. घरी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत छान व्हायचे. इतकी माणसे आली कसे काय होणार असे टेन्शन यायचे नाही.

माझ्या पुढची पिढी सूनांची. त्यांनी पुस्तकी शिक्षण आमच्यापेक्षा अधिक घेतले होते. पण त्यांच्या पिढीपासूनच नवरा- बायको ही समानता आली. समानता आली तशी नवरा-बायको मध्ये थोडीफार भांडणे आली. पण तरीही ही पिढी पण सुसंस्कारित निघाली. पुरुष तर अर्थार्जन करायचेच. पण काही शिकलेल्या बायकाही आपले शिक्षण वाया जाऊ नये म्हणूनही नोकरी करायला लागल्या. त्यांना त्यांच्या वयाच्या चाळीसाव्या वर्षापासून नवीन तंत्रज्ञानाचे फायदे मिळाले. टीव्ही आला, मोबाईल आला, लॅपटॉप आला या नवीन तंत्रज्ञानाचा फायदा या पिढीला खूप झाला.

माझ्या आईच्या पिढीचे लोक देवधर्म, चालीरिती खूप सांभाळायचे. त्यामुळे मध्यम परिस्थितीतील कुटुंबामध्ये सुद्धा वार लावून शिकणारा मुलगा जेवायला असायचा. तो सहज या कुटुंबात सामावला जायचा. उभयपक्षी प्रेम असायचे. वार लावून जेवणारे विद्यार्थी माझ्या पिढीपासून कमी झाले. पण ज्यांना जरुरी आहे अशा मुलांना आम्ही कुवती प्रमाणे आर्थिक मदत करत होतो. समाजातील धनीकही अशा मुलांना आर्थिक मदत करायचे. या पिढीने गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध हे ग्रंथ वाचलेले होते. त्यातील कर्मयोग, परमार्थ, परोपकार, नेटका प्रपंच जाणून घेतले होते. त्यामुळे त्यांची वैचारिक झेप चांगली होते. या पिढीने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी धडपडलेले स्वातंत्र्य सेनांनी पाहिले. त्यांची भाषणे ऐकली. सचोटीने, सत्याने राजकारण करणारे राजकारणीही पाहिले.

पुढे नातवंडांची पिढी आली. ही पिढी पण पुस्तकी अभ्यासात खूप हुशार आहे. व्यक्तिमत्व उत्तम असायला फक्त पुस्तकी शहाणपण उपयोगी ठरत नाही. उत्तम व्यक्तिमत्त्वामध्ये अनेक गोष्टी येतात. या नातवंडांच्या वेळी तंत्रज्ञानाचा वापर सर्रास

सुरू झाला. त्याचा नको इतका प्रसार झाला. लहान मुलांच्या हातात आया मोबाईल देऊ लागल्या. लहान बाळांना जेवायला घालायचे कष्ट नकोत म्हणून आया त्यांना मोबाईल दाखवत दाखवत जेवायला घालू लागल्या. गोष्टी सांगून मुलाला जेवायला घालणारी आई लुप्त झाली. आई-बाबा अप्पा दादा म्हणणारी मुले मम्मा, पप्पा म्हणू लागली. या मुलांच्यावर होणारे संस्कार आपले राहिले नाहीत. पाश्चिमात्य संस्कृतीचे होऊ लागले. या पिढीच्या मुलांचे संसार मी आणि माझी पत्नी व एकच मुल असे झाले! त्यात आजोबा आजींचा समावेश नाही. थोड्या कुटुंबात आजी आजोबा दिसतात. एक तर ते स्वतंत्र राहतात. नाही तर वृद्धाश्रमात. मुलीही आपल्या करिअरला सर्व ते प्राधान्य देऊ लागल्या. आपल्या करिअरमुळे त्यांना संसारात नवऱ्या शिवाय इतर माणसे नको झाली. हे असे का याचा विचार त्यांनी कधी केलाच नाही. नवरा आपल्या व्यवसायात, नोकरीत दंग आणि बायकोही! मग एकुलते एक मूल पाळणाघरात! आई-वडिल आजोबा आजी यांचे मोलाचे संस्कार पाळणाघरात कसे होणार?

श्रीमंत घरातील हाय-फाय संस्कृती असलेली घरे तर खूपच वेगळी! त्यांना तर कशाचीच किंमत नाही. संस्कार म्हणजे काय तो कशाशी खातात काहीच माहिती नाही. अशी मुले-मुली बेताल वागू लागली. व्यसनाधीन बनू लागली. दारू पिणे, सिगरेट ओढणे, मावा खाणे याची त्यांना खंतच नव्हती. मुलीही यातून सुटल्या नाहीत. त्या पण बेतालाच वागू लागल्या.

मी चार वर्षांपूर्वी पुण्याला एका स्पर्धेत भाग घेतलेला असल्यामुळे बक्षीस समारंभास मैत्रिणीला घेऊन गेले होते. आम्ही एक रात्र राहणार असल्यामुळे लॉजवर उतरलो. रिसेप्शनिस्टने आम्हाला खोलीची किल्ली दिली. खोली वरच्या मजल्यावर

होती. जिना चढून गेल्यावर पॅसेजमध्ये तीन-चार तरुण मुली गप्पा मारत उभ्या होत्या. त्या गप्पा मारत चक्क सिगरेट ओढत होत्या. ते पाहून आम्ही दोघी खिन्न झालो. कुठे गेली आपली संस्कृती! सिगरेट ओढणे हे पाप जरी नसले तरी याचा शारीरिक आरोग्यावर दुष्परिणाम होतो. हे त्यांना शाळेत शिकवले नव्हते का? कपड्यांच्या बाबतीतही तेच. अंगभर कपडे घालणे यांना फॅशनच्या नावाखाली कमीपणाचे वाटते. आपल्या देहाचे प्रदर्शन करणे यातच त्यांना सुख वाटते. मग बलात्कार होतात म्हणून का ओरडता? देहाला पूर्ण झाकणारे कपडे आपल्या देहाचे इतरांच्या नजरापासून आपले संरक्षण करतात. हे यांना माहित नसावे. व्यक्तिमत्व हे नुसत्या पुस्तकी शिक्षणाने घडत नाही. तर ते संस्कारामुळे घडते. संयमित वागणे, बोलणे, आचरण करणे, दुसऱ्याला समजून घेणे अशा अनेक गोष्टी व्यक्तिमत्त्वाचे पैलू आहेत.

मुलांच्या जवळ लहानपणापासूनच स्मार्टफोन आला, इंटरनेट आले, घरातच सिनेमा आला, पार्ट्या सुरू झाल्या आणि माणुसकीचा लोप झाला. फॅशनच्या नावाखाली कसलेही वागणे हेच ग्राह्य धरले जाऊ लागले. एवढेच नव्हे तर अगदी गाव पातळीवर सुद्धा हे बेताल वागणे सुरू झाले. कॉलेजमध्ये शिकत असलेली मुले शिक्षण अर्धवट सोडून पळून जाऊन विवाह करू लागली. आयुष्याबद्दल कधीच गंभीरपणे यांनी विचारच केलेले नाही. हे सगळे पाहून आमच्यासारखे आजी-आजोबा दुःखी होतात. मुलांची बौद्धिक क्षमता वाढली. पण नीतिमत्ता घसरली. शिक्षणामुळे मुलांचा जो सर्वांगीण विकास व्हायला हवा तो झालाच नाही!

पहिले शिक्षण भारतात घेऊन पुढील शिक्षणासाठी मुले परदेशी जाऊ लागली. तिथल्या पगाराला, ऐषो आरामीला भुलली तिथलीच झाली! त्यांच्या ज्ञानाचा उपयोग जो त्यांच्या देशाला होणे अत्यंत गरजेचे आहे तो झालाच नाही. कारण त्यांना

पैसा हेच सर्वस्व वाटते. भौतिक सुखाला सर्वस्व मानणारी ही पिढी आई-वडिल भाऊ-बहीण यांना विसरायला लागली. देहाचे सुख कुठल्या मर्यादेपर्यंत उपभोगायचे असते हे यांना माहितच नाही. मग ती अनारोग्याच्या भोवऱ्यात पडली नाहीत तर नवलच!

या पिढीतील सगळीच मुले-मुली अशी आहेत असे मी अजिबात म्हणत नाही. चांगले व्यक्तिमत्व असणारेही खूप आहेत. म्हणून तर अजूनही समाज तरुन आहे. पण ज्या गोष्टी अपवादात्मक असायला हव्यात त्या सर्रास होऊ लागल्या आहेत, याचे दुःख होते!

# □ बुद्धिमत्ता आणि वृद्धसेवा

हल्ली आपल्याकडे वृद्धसेवा हा एक यक्षप्रश्न बनला आहे. वृद्ध जोपर्यंत हिंडत फिरते असतात तोपर्यंत घरात फारसा प्रश्न उभा रहात नाही. कारण ते लोक काही ना काही घरात सूनेला मदतच करीत असतात. प्रश्न तेव्हा येतो जेव्हा वृद्धांच्या कडून काहीही काम होईनासे होते. त्यांना शारीरिक त्रास होऊ लागतात. त्यावेळी त्यांना दुसऱ्याची मदत लागते. काही वृद्ध वृद्धापकाळी भावनिक होतात. त्यांना आपल्याबरोबर सतत कोणीतरी असावे. घरच्यांनी आपली प्रेमाने चौकशी करावी असे त्यांना वाटते. पण या त्यांच्या भावना जाणून घेतल्या जातीलच असे नसते. त्यामुळे ते एकाकी पडतात. त्यातून दोघांपैकी एकाने साथ सोडली असेल तर दुसऱ्याला खूपच कठीण होते. तरुणांच्या ही काही अडचणी असतीलही. पण हे विचार मनात आले आणि वाचलेल्या एका लेखाची आठवण झाली.

यक्षाचा सहावा प्रश्न होता माणूस बुद्धिमान कशामुळे बनतो? त्याला युधिष्ठिरांनी दिलेले उत्तर होते, वृद्धांच्या सेवेने. हे उत्तर अनेकांना अचंबित करणारे असेल. वृद्धांच्या सेवेने माणूस बुद्धिमान कसा होईल. युधिष्ठिरांनी पूर्ण विचार करून उत्तर दिले आहे. त्यांनी नुसती सेवा असे म्हटले नाही कारण कोणाचीही सेवा हे काम पुण्य देणारे आहे. पण वृद्धांची सेवा हे काम नुसतेच पुण्य देणारे नसून ते आपल्या बुद्धित वाढ करणारे आहे. वृद्ध लोकांजवळ अनेक अनुभवांची शिदोरी असते. त्यांना आयुष्यात आलेल्या अनुभवांचे फायदे तोटे ते आपल्यापर्यंत पोहचवत असतात.

त्यामुळे तरुणांच्यावर असा एखादा प्रसंग आला तर वृद्धांच्या अनुभवातून तरुण आलेला प्रसंग सहज हाताळू शकतो. वृद्धांनी अशा प्रसंगी केलेली चूक तरुण सहज टाळू शकतो. वृद्धांच्या अशा सेवेच्या कारणामुळे आपणही अनुभव संपन्न होतो. त्यांच्या संपर्कात राहणे फायद्याचे ठरते. ही अनुभव संपन्नता म्हणजे आपण बुद्धिमान होत असल्याची प्रक्रिया होय. म्हणूनच युधिष्ठिराने असे अचूक उत्तर दिले. आपण ऐकतो की ज्येष्ठ मंडळी सहजपणे बोलून जातात आम्ही तुमच्यापेक्षा चार उन्हाळे-पावसाळे, चार टक्के टोणपे, जास्त खाल्लेत. याचाच अर्थ ज्येष्ठांचा अनुभव अधिक असतो. संत सांगतात अनुभवासारखा गुरु नाही. हे सत्यच आहे. त्यामुळे घरातील वृद्धांकडे कानाडोळा करणे बरोबर नाही. ते अडगळीतील वस्तू प्रमाणे नसतात. म्हणून त्यांचा सन्मान करणे हे शिकायलाच हवे. त्यांचे केस हे अनारोग्याने पांढरे झालेले नसतात हे ध्यानी घ्यावे.

दुसऱ्याच्या अनुभवाचा लाभ करून घेणे केव्हाही फायद्याचे व योग्यही!

ज्येष्ठांनीहि येथे लक्षात ठेवले पाहिजे की संत तुकारा म्हणतात तसे आता उरलो उपकारा पुरता! अशा वागण्याने ज्येष्ठ अडगळीत जाणार नाहीत. आपल्याजवळ असलेला शहाणपणा मागितल्याशिवाय देऊ नयेच. अलिप्तपणे रहायला शिकलेच पाहिजे. कधीतरी घरातील तरुण हे जाणतील व त्यांना कळून येईल की आपणहि वृद्ध होणार आहोत. त्यावेळी आपल्यालाही मुलांकडून चांगल्या वागणुकीची अपेक्षा असणारच. आजपर्यंत आपण जीवनात मिळवलेले यश कशामुळे मिळवू शकलो त्या आपल्या अनुभवाचा फायदा मुलांनी करून घ्यावा असे त्यावेळी त्यांनाही वाटणारच. युधिष्ठिराने असे उत्तर उगीच दिलेले नाही!

तेव्हा तरुणांनो वृद्धांच्या संपर्कात राहून त्यांच्या अनुभवाचा फायदा आपले जीवन यशस्वी होण्यासाठी करून घ्या. त्यांना नमस्कार केला नाही तरी चालेल पण त्यांना प्रेम द्या व जरूर पडली तर त्यांची सेवा करा.

# □ स्वधर्म

सदा देवकाजी झिजे देह ज्याचा|
सदा रामनामे वदे नित्य वाचा|
स्वधर्मेची चाले सदा उत्तमाचा|
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा|

जो भगवंताचे नाम घेतो, आणि आपल्या वाट्यास आलेले विहित कर्म जो उत्तम रितीने करतो तो पुरुष भगवंताचा उत्तम भक्त असतो. म्हणजे श्री समर्थांनी जरी स्वतः प्रपंच केलेला नसला तरी ते प्रपंची माणसाला सांगतात वाट्याला आलेले कर्म उत्तम रितीने कर.

प्रत्येकाचा स्वधर्म वेगळा. तो ज्याने-त्याने जाणायला हवा. मनुष्याचा स्वभाव असा आहे की त्याच्या वाट्याला जे कर्म आलेले असते त्यात तो संतुष्ट नसतो. मेकॅनिकला वाटते आपण इंजिनिअर व्हायला हवे होते. इंजिनिअरला वाटते आपण कंपनीचे मालक व्हायला हवे. गृहिणीला वाटते आपण नुसते घरकाम करून आयुष्य का घालवायचे आपण नोकरी करून पैसा मिळवायला हवा.

आपल्याला मिळालेले काम उत्तम रितीने करून त्यातच आपण श्रेष्ठ होऊ शकत नाही का? आज कुशल मेकॅनिकची आवश्यकता खूप आहे. उत्तम मेकॅनिकला यश, पैसा, प्रसिद्धी हे सर्व मिळू शकते पण ते केव्हा? तर त्याने विहित कर्म उत्तमरित्या करायचे ठरवले तरच!

अहो,गृहिणीला कशाला हवी नोकरी? आज प्रपंच उत्तम करून मुलांवर चांगले संस्कार करणे व त्यांना उत्तम नागरिक बनविणे हे किती महत्त्वाचे काम. हा तर समाजाचा पाया आहे. गृहिणीने आपल्या मुलांना जर उत्तम नागरिक होण्याचे संस्कार, शिक्षण दिले तर समाजाची प्रगति देशाची प्रगती निश्चितच होईल. पण हाती आलेले सोडायचे व भलत्याच्या मागे पळायचे हा मनुष्य स्वभाव, त्याला अधोगतीकडे नेतो.

चांगल्या चप्पल शिवणारा कलाकार आज जरी छोटा असला तरी तो उद्या स्वतःचे चप्पलचे दुकान थाटेल.

आदरणीय श्री विनोबा भावे यांचे गीतेवरील प्रवचने हे पुस्तक वाचले म्हणजे स्वधर्मची व्याख्या कळू शकते. साध्या-साध्या गोष्टींची उदाहरणे देऊन त्यांनी स्वधर्म कशाला म्हणायचे हे सांगितले आहे.

श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात उत्तम रितीने जो स्वधर्माचे पालन करतो पण ते करीत असतांना भगवंताला विसरत नाही तोच उत्तम भक्त होय.

विश्वमनाचे लहान रूप म्हणजे माणसाचे मन. विश्वमन हे परमेश्वराचे आस्तित्व विसरत नाही. माणसाचे मन ती गोष्ट विसरते.

गीतेत श्रीकृष्णाने अर्जुनाला उपदेश केला. जीवनात खरे कर्तव्य कोणते, ते कसे पार पाडावे, जीवनाचे सार्थक कशात आहे. हा उपदेश अर्जुनाच्या निमित्ताने सर्व मानव जातीसाठीच आहे.

अर्जुन स्वधर्म सोडायला तयार झाला होता. व त्याच्या समर्थनार्थ त्याने बरेच तत्त्वज्ञान श्रीकृष्णाला ऐकवले. म्हणून भगवंतांनी अर्जुनाला युद्ध करणे कसे

आवश्यक आहे ते सांगितले. शास्त्रानुसार प्रत्येकाच्या वर्णा श्रमाप्रमाणे त्याला जी आवश्यक कर्मे ती त्याने करणे हा प्रत्येकाचा धर्म होय. म्हणून अर्जुनाला श्रीकृष्ण हेच सांगतात की स्वधर्माला अनुसरून तुझ्यासाठी जे श्रेयस्कर आहे ते तू कर.

युद्धक्षेत्री विरुद्ध बाजूला अर्जुनाचे बंधु गुरु पितामह असतात. त्यांच्यावर बाण चालविणे हे अर्जुनाला न पटणारे. पण भगवान म्हणतात ते तू पाहू नकोस युद्ध करणे हाच आता तुझा धर्म आहे. तेव्हा तू ते कर. क्षत्रियाचा तो धर्म आहे. तेव्हा उचल बाण.

आपण सामान्य माणसं! आपल्या पूर्व जन्मीच्या कर्मानुसार ह्या जन्मी वाट्याला आलेले कर्म आपण उत्तमरित्या, सचोटीने करणे हाच आपला धर्म आहे.

कुठल्याही प्रकारची दुष्ट वासना मनात न ठेवता आपण तो स्वधर्म जाणून केला पाहिजे. दुष्ट वासनेने केलेले कर्म हे अशांती देणारे आहे.

खरंतर प्रत्येक घटनेचा कर्ता करविता हा भगवंत असतो. आपण निमित्त मात्र. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसतेच. लोकांच्या घरी जाऊन पोळ्या लाटण्याचे काम करणारी स्त्री ही अजिबात कमी प्रतीची नसते. उत्तम पोळ्या करणारी म्हणून तिचे मालक खुष होऊन तिला म्हणतात अगं, तू पोळ्या इतक्या छान करतेस की तुला मी त्याच्यातली P.H.D. देईन. ती स्त्री हे काम मोठ्या समाधानाने, आनंदाने करते. त्यामुळे खाणाऱ्यांचा आत्माही संतुष्ट होतो.

तेव्हा आपली बुद्धी स्थिर ठेवून स्वधर्मानुसार कर्म करणे हे महत्त्वाचे आहे.

सध्याच्या चढाओढीच्या युगात आपली नैतिकता कायम ठेवून कर्मे करत करतच जीवन सार्थकी लावायचे आहे. स्पर्धेच्या नावाखाली भ्रष्ट आचरण न करता

शुद्ध आचरण करायचे आहे. कर्म हे तर कोणालाच सुटलेले नाही. लोकांनी केवळ चांगले म्हणावे यासाठी ते करायचे नसून सर्वांच्या भल्यासाठी आसक्ति सोडून निष्काम बुद्धीने ते करावयाचे आहे.

म्हणून भगवान म्हणतात स्वकर्तव्य कितीही अवघड वाटले तरी त्या स्वधर्माचेच आचरण प्रत्येकासाठी श्रेयस्कर आहे.

श्रीकृष्णाच्या उपदेशामुळेच अर्जुन स्थिर बुद्धीने विचार करतो व युद्धास तयार होतो आणि युद्धात यशस्वीही होतो.

मी पणा सोडून केलेले कर्म हे निर्लेप असते. आपल्या प्रत्येक कर्माच्या मागे भगवंत आहे हे ठामपणे समजून घेऊन केलेले विहीत कर्म हे उत्तम असते. तसे करणाऱ्याचे जीवन सार्थकी लागते.

आपल्या वाट्याला आलेले कर्म करीत असतांना त्यात आपण अधिक प्रगती करू नये असे अजिबात नाही. छोटा व्यवसाय करणाऱ्याने मोठा उद्योजक अवश्य व्हावे. संरक्षण दलात असणाऱ्या कॅप्टनने कर्नल जरूर व्हावे. माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे. त्याने प्रगतीशील असणे जरुरीचेच आहे. पण कुठल्याही क्षेत्रात त्याच्या प्रगतीमुळे तो कितीही मोठा झाला तरी त्याचे पाय जमिनीवर असणे आवश्यक आहे. त्याने अहंकाराला दूर ठेवून माझ्या आत्म्यात वसत असलेल्या भगवंताने मला इतके मोठे केले हे कदापि विसरू नये.

# □ खेडेगाव का सुधारत नाही?

मी गेली 54 वर्षे कागवाड या खेडेगावात रहात आहे. माझ्या वयाच्या 40 व्या वर्षापासून महिला मंडळाच्या माध्यमातून समाजकार्य सुरू केले. आमचे सामाजिक काम सर्व सामान्यांच्या भल्याचे असायचे. आमच्या मंडळात असणाऱ्या महिला या महाराष्ट्रातून कर्नाटकात आलेल्या आहेत. साहजिकच आमची सर्वांची भाषा मराठी होती. आम्ही अनेक उपक्रम राबविले. ते सर्व महाराष्ट्रातल्या लोकांना बोलावून. एखाद्या उपक्रमाला कानडी लोकांनी विरोध केला पण आम्ही त्याला दाद दिली नाही. सामाजिक कामाचे मूल्य जाणणारे जे लोक होते. त्यांचा आमच्या उपक्रमास पाठिंबा असायचा. कारण हे उपक्रम गावाची शान उंचावणारे होते.

सर्वसामान्य सर्वांनाच रोजच्या जीवनात सुखाने जगता यावे त्यासाठी काही सोयी आवश्यक असतात. त्या दृष्टीने आमचे गाव तसे मागासलेलेच राहिले आहे.

गावात नदीचे पाणी नळाद्वारे दिले जाते .पण ही यंत्रणा सुद्धा मधे - आधे कोलमडत असते. त्यामुळे लोकांचे हाल होतात. असे का होते? नदीवर बसविलेली मोटार काही वेळा जळते. ती लगेच दुरुस्त करून आणली जातच नाही. म्हणजे पंचायतीचे काम हे योग्य तऱ्हेने चालत नाही हे जाणवते. सचोटीने प्रामाणिकपणे काम करणे हे अधिकाऱ्यांना नको झालेले असते. याबद्दल कोणालाही खेद, खंत वाटेनाशी झालेली आहे. आपल्याला पगार मिळतो वरचढ पैसा मिळतो आणि काय हवे? लोकांना त्रास होतो याचा विचार केला जातच नाही.

गावात सगळीकडे उघडी गटारे. त्यातील घाण कधीतरी काढली जाते. पण ती गटारीचे वर टाकली जाते. ती घेऊन जाण्याची व्यवस्था केव्हातरी सवडीने कामगार करतात. त्यांना वेळच्यावेळी पगार मिळत नाही. त्यामुळे तेही आपल्या कामाकडे दुर्लक्ष करतात.

ग्रामपंचायतच्या निवडणुका पाच वर्षांनी होतात. लोकांनी केलेल्या मतदानाप्रमाणे सदस्य निवडले जातात. कोणीही निवडून आले तरी बरीच वर्षे राजकारण गावच्या पाटलांचेकडेच होते. सरकारी नियमानुसार ग्रामपंचायतीच्या चेअरमनची जागा काही वर्षे मागासवर्गीय स्त्रियांसाठी आरक्षित होती. त्या स्त्रियांना पुढे यायला मिळाले पाहिजे हे अगदी खरे पण या स्त्रीया कधीच घराबाहेर सुद्धा पडलेल्या नसल्यामुळे एकदम सरपंचाच्या खुर्चीवर बसून या कारभार कशा काय करू शकणार? हा विचार व्हायला हवा होता. अशा महिलांना निवडून येण्यास आधीच ट्रेनिंग द्यायला हवे होते. अशा बायकांचे नवरेच मग ग्रामपंचायतीत काम करतात. सचोटीचा कारभार करणे हे अलीकडे कोणालाच माहीत नाही असे दिसते. गावाच्या सुधारणेपेक्षा स्वतःचे घर कसे सुधारेल हे पाहणारीच मंडळी दिसतात.

अलीकडे काही वर्षे ग्रामपंचायतींना सरकारने भरपूर फंड्स उपलब्ध करून दिले आहेत. पण ते फंड्स योग्य त्या कारणासाठी उपयोगात आणले तर गाव सुधारण्यास वेळ लागणार नाही. स्वतःला भरपूर पैसा मिळावा ही हाव जोपर्यंत कमी होत नाही तोपर्यंत अनीतीने का असेना पैसा मिळवायचाच हा दृष्टिकोन दिसून येतो. त्यामुळे फंड आले तरी त्या रकमेचा पूर्ण विनियोग गावाला आवश्यक असणाऱ्या कामांसाठी होतोच असे अजिबात नाही.

बरं नागरिकांनीही संघटित होऊन या प्रत्येक गोष्टीचा जाब ग्रामपंचायतीला का विचारू नये? गाव सुधारण्याची तळमळ गावकऱ्यांमध्येही हवी. गावकरी उदासीन राहतो मग अधिकाऱ्यांचे अधिकच फावते.

मी ग्रामपंचायतीमध्ये दहा वर्षे काम केले. त्यातल्या त्यात माझ्या वेळचे सगळे सदस्य बरे होते. माझ्यावेळी प्रत्येक वॉर्डात सभा घेत असू. त्यामुळे त्या वॉर्डातील लोकांच्या समस्या कळायच्या.

ज्या त्या वॉर्डात निवडून आलेल्या सदस्याच्या पुढाकाराने प्रत्येक वॉर्डात अधून मधून सभा घेतल्या जायच्या. त्यामुळे प्रत्येक वॉर्डातील समस्या समजायच्या. त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जायचा. पुढे हे ही बंद पडले. काही वर्षे कोरकमिटीही होती. त्याची पण मी सदस्य होते. कोरकमिटीचे आम्ही सदस्य मीटिंग घेत असू व गावातील कोणती कामे व्हायला हवीत याची चर्चा करीत असू.

शेवटी काय सदस्य म्हणून येणारे हे समाजाबद्दल प्रेम असणारे त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे अशी तळमळ असणारे हवे.

दुसरी अशी ही एक माणसाची मानसिकता असते की आपल्याला सगळ्या लोकांनी मान द्यावा. स्वतःला पुढारीपणा मिळावा यासाठी हे लोक चांगले काम करण्याच्या ऐवजी आपला काहीही संबंध नसलेल्या कामात ढवळाढवळ करतात. एखादे चांगले चाललेले काम पाडण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरून स्वतःचा मी पणा दाखविण्याची त्यांना अत्यंत आवड असते. अशा माणसांच्यामुळेही गावाचे नुकसान होते.

एक उदाहरण सांगते गावात एक कुटुंब एका बोळात राहत होते. त्यांची आई वृद्ध झाली होती. त्यांच्याकडे संडास नव्हता. म्हाताऱ्या आईला लांब बाहेर या कामासाठी त्यांना जाता येणे अवघड झाले. त्यांनी आपल्या घरातच संडास बांधायचे ठरवले व त्याचे पाणी समोरूनच जाणाऱ्या गटारीला सोडायचे ठरविले. काम पंचायतीच्या परवानगीने सुरू झाले. काहीही कारण नसतांना गल्लीतील लोकांनी बांधकाम, पंचायतीकडे तक्रार करून बंद पाडले. त्या घरातील कर्ता तरुण माझ्याकडे आला. मग मला हे सर्व ऐकून वाईट वाटले. मी त्याला घेऊन पंचायतीकडे गेले. त्यावेळी घर तेथे संडास ही सरकारी योजना जोमात होती. मी पंचायतीला म्हटले तुम्ही ही योजना राबवायचे सोडून या माणसाचा संडास बांधू नका म्हणणाऱ्यांची बाजू खोडून का काढत नाही. तक्रार करणारा जर उपोषणाला बसणार म्हणतो, तर मीही उपोषणाला बसेन. मी आजपर्यंत केलेल्या सामाजिक कामाची जाण अनेकांना होती. त्यामुळे हा संडास पुढे पूर्ण बांधला गेला.

हे एक उदाहरण म्हणून मी सांगितले. अशी आणखीही काही कामे आहेत की ज्याला तथाकथित पुढारी म्हणवून घेणारे विरोध करतात.

अशा परिस्थितीत गावाचे काय होणार? शिवाय भ्रष्टाचाराची कीड तर सगळीकडे आहेच. सरकारकडून आलेले फंड त्या कामासाठी पूर्णपणे खर्च केले जात नाहीत त्याला कात्री लागते.

तेव्हा कुठल्याही पक्षाची माणसे असोत. त्यातल्या त्यात चांगल्या समाजसेवी माणसाला मतदान करणे हे जनतेने कटाक्षाने केले पाहिजे तरच गाव सुधारेल.

लोकांनी गाव आपलेच आहे हे ठाम समजून पंचायतीला ते करीत असलेल्या कामाबद्दल चौकशी, प्रसंगी जाब विचारलाच पाहिजे. हे एक महत्त्वाचे सामाजिक कामच आहे.

लोकांनी जागरूकता दाखवायलाच हवी. नाही तर गावात अकारण गुंडगिरी फोफावते व सुधारणेला खीळ बसते.

# □ नास्तिक

देव न मानणाऱ्या लोकांना आपण नास्तिक म्हणतो. खरोखर नास्तिक असणाऱ्या लोकांचं मला तरी खूप कौतुक वाटतं. कारण त्यांचं मनोधैर्य खूप मोठे असते. त्यांना न दिसणाऱ्या देवावर विश्वास ठेवावा असे वाटत नाही. एक प्रसिद्ध असलेले लेखक तर असे म्हणतात देवामुळे लोक एकमेकांची डोकीही फोडतात. देवामुळे त्यांची भांडणे विकोपाला जातात. हे खरेही आहे. पण असे का होते बरे? तर आपली भांडणे ही देवालयामुळे होतात. माणसाला सगुण भक्ती ही अतिशय प्रिय आहे. निर्गुण निराकार असलेला भगवंत ते पाहू शकत नाहीत. तो पहाण्याची पात्रता जेव्हा माणसात येईल त्यावेळी ही भांडणे होणारच नाहीत.

गीते सारखा ग्रंथ काय सांगतो. विहीत कर्म अतिशय मनोभावे, निष्काम वृत्तीने केले पाहिजे. आपण वाट्याला आलेले कर्म करतो पण त्यात आपला अहंकार असतो आणि अशा अहंकारामुळे आपण सुखी समाधानी राहू शकत नाही. ज्या शक्तीने हे विश्व निर्माण केले आहे व माझ्या वाट्याला जो पार्ट दिला गेला आहे तो मी उत्तम रितीने करीन हे महत्त्वाचे!

आपण जन्माला येतो ते आपल्या इच्छेने नाही व मरणही आपल्या इच्छेने आपल्याला पाहिजे तेव्हा येते असे नाही.

मग ज्या शक्तीने आपल्याला हे सर्व करायला लावले त्याचे आभार आपण मानलेच पाहिजेत. ते कसे मानायचे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक विचार आहे.

साधु-संत तर म्हणतात जे कां रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा असा मनुष्य देवत्वाला पोहचलेला असतो. त्याला आणखी एका देवाची गरजच नाही.

पण आयुष्याच्या वेग-वेगळ्या टप्प्यावर माणसाच्या भावना बदलतात. तरुणपणी सर्वच दृष्टीने शारीरिक मानसिक सुदृढ असलेली शरीरे म्हातारपणी कमकुवत होतात. अशावेळी म्हातारपण सुरळीत जाण्यासाठी श्रद्धेचे बळ निश्चितच उपयोगी पडते. अशावेळी नामस्मरण निश्चितच उपयोगी पडते. ज्यांनी याचा अनुभव घेतला ते आपल्याला हे सांगतात त्यावर विश्वास ठेवून अनुभव घेणे हे महत्त्वाचे.

एखादा परका मनुष्य मालकाच्या घराकडे येतांना दिसला तर मालकाचे कुत्रे भुंकायला लागते. या कुत्र्याच्या भुंकण्यावर विश्वास ठेवून आसपासची कुत्रीही भुंकायला लागतात. इतर कुत्र्यांनी त्या माणसाला पाहिलेलेही नसते. पण इतर कुत्री आपल्या मित्राच्या भुंकण्यावर विश्वास ठेवतात.

साधु-संतांनी परमेश्वराच्या अस्तित्वाचा जो अनुभव घेतला आहे त्यावर आपण विश्वास ठेवायला हवा. हा अनुभव प्रत्येकाला मिळावा असे तर श्री समर्थांचे म्हणणे. म्हणून तर त्यांनी दासबोध, मनाचे श्लोक लिहिले.

गीता-ज्ञानेश्वरी दासबोध हे ग्रंथ उत्सुकता म्हणून तरी आपण वाचले पाहिजेत. ते वाचल्या शिवाय त्यातील ज्ञान, अनुभव आपल्याला कळणार नाहीत. ते वाचल्यावर त्यातील ज्ञान आपल्या मनावर बिंबले, पटले तर आपले मन आपोआपच त्या विश्व कर्त्यास भजेल.

देव न मानणाऱ्या लोकांची आपल्या कार्यावर निष्ठा, श्रद्धा असते. ते आपल्या कामातच देवाला पाहतात.

काहींना निसर्गातच देव दिसतो. त्याची अलौकिक शक्ती दिसते. वरून कोसळणारा धबधबा, अथांग समुद्र, रप् - रप् पडणारा पाऊस, पहाटेच्या वेळी उमलणारी फुले या सर्वांमधील जी अनामिक शक्ती आहे ती स्तिमित करणारी आहे. अशांना परमेश्वराच्या सगुण मुर्तीत देव दिसत नाही. तो त्यांना या निसर्गात दिसतो.

सामाजिक काम करणाऱ्या लोकांना आपल्या कामात देव दिसतो. ते आपला वेळ, आपला देह दुसऱ्यासाठी झिजवतात. भगवान श्रीकृष्ण सुद्धा परोपकार करा हेच सांगतात. सगुण भक्ती ही अध्यात्माची पहिली पायरी आहे. साधनेसाठी एकेक पायरी वर चढून जावे लागते. आत्मसाक्षात्कार हा एका जन्मात होणे शक्यच नसते पण प्रयत्न तर केला पाहिजे.

आपण आपल्या दैनंदिन व्यवहारामध्ये एखाद्याने आपले काम केले तर त्याला लगेच Thank You म्हणतो. मग ज्याने हे विश्व निर्माण केले त्या भगवंताचे किती आभार मानावेत? मानवाने सायन्समध्ये कितीही प्रगती केली असली तरी काही गोष्टी त्याच्या बुद्धिमत्तेच्या पलीकडे आहेत. आणि म्हणून डॉक्टर सारखा माणूसही काही कठीण प्रसंगी पराधीन आहे. जगती पुत्र मानवाचा असे म्हणतो.

परमेश्वराचा अनुभव घ्यायला शब्दपांडित्य उपयोगी पडत नाही. नामस्मरणाने तो अनुभव मिळेल हे संत कळवळून सांगतात.

समर्थ तर म्हणतात निष्फळ वाद करण्यात वेळ दवडू नका. तुम्ही स्वतः त्या विश्व निर्मात्याचे भक्त व्हा व इतरांनाही करा.

आयुष्यात ऐहिक सुख भोगायला मिळते. पण अनेक संकटेही कोसळतात. त्यांच्याशी सामना करतांना श्रद्धेचे बळ उपयोगी पडते. भगवंताची भक्ती माणसाला अशावेळी कोसळू देत नाही.

एक प्रवचनकार म्हणतात तुम्हाला राम, राम म्हणायचे नाही नां नका म्हणू. श्रद्धेने खांब, खांब म्हणा तुम्हाला कळणारही नाही की खांब म्हणता- म्हणता राम केव्हा आले!

सायन्सने तर सिद्ध केले आहे की विठ्ठल विठ्ठल हे नाम घेतल्याने हृदयाचे ठोके नियमित होतात.

धार्मिक गोष्टींच्या अध्ययनाने मनुष्य विवेकी होतो. व हा विवेक वापरायला अध्यात्म शिकवते. जीवनात आपण पद, प्रतिष्ठा मिळवतो. या पदावर अहंकाररहित कसं रहावं हे विवेक शिकवतो.

आपला माणूस जेव्हा देह सोडतो त्यावेळेला नास्तिकाचे मनही हेलावते. डोळ्यात अश्रू उभे राहतात. तो असे म्हणू शकत नाही की एक दिवस माणूस मरणारच! तर तो त्या शवाला खाली वाकून नमस्कार करतो. आत्म्याला सद्गति मिळो म्हणून प्रार्थना करतो!

# □ दीप अमावस्या

आज दीप अमावस्या! सर्व दिवे कसे घासून पुसून लख्ख केले! या दिवशी आपण देवघरातील दिव्यांना स्वच्छ घासतो. हेतू हा की त्याचा प्रकाश स्वच्छ पडावा. व मनोभावे फुले व वस्त्र घालून आपण त्याची पूजा करतो. लख्ख प्रकाश आपल्या आयुष्याच्या मार्गावरही पडावा म्हणजे पुढे जाण्यासाठी आपल्याला पुढील मार्ग दिसण्यासाठी त्याचा उपयोग होतो. दिवा हा मानवाच्या जीवनातील महत्त्वाची गोष्ट आहे. देवापुढे लावलेली लखलखीत समई तिचे शांत तेवणं मनाला आनंद देतं.

आपली मुलं सुद्धा पुढच्या पिढीचे दिवेच की! त्यांना पण आपण पालकांनी छान वळण लावले असेल तर तेही असेच प्रकाशतात. जीवनात अनेक वादळे येतात संकटे येतात पण संस्कारामुळे त्यांची जीवन ज्योत तेवतच राहते. त्यांचे आयुष्य उजळून निघते. वारा आला तर समईचे ज्योत फडफडते व तिच्यामध्ये असलेल्या तेलामुळे ती विझत नाही. थोडीशी हलते फडफडते पण पुन्हा तेवतेच. अमावस्येला आपण समईतील काजळी काढून टाकतो. पुन्हा ती स्वच्छ प्रकाशमान व्हावी म्हणून. तसेच मुले ही वंशाचा दिवा असतात. त्यांना वाईट वळण लागू नये म्हणून काळजी घेतलीच पाहिजे.

हल्ली मुलं घरी जास्त नसतात. शाळा, कॉलेज मित्र-मैत्रिणी यातच त्यांचा वेळ अधिक जातो. शिवाय मोबाईल, कम्प्युटर हे आहेच. नविन ज्ञान जरूर पाहिजे पण ती वाहवत जात नाहीत ना याकडे लक्ष दिलेच पाहिजे. ती जर काही चुकत असतील

तर त्यांच्या चुका वेळीच दाखवायला हव्यात. त्यांचे मन दुखावेल म्हणून त्यांच्या वाईट गोष्टी मुळीच खपवून घेऊ नये. असं वेळेवर सांगणं महत्त्वाचं आहे. नाहीतर ते अंधारात राहतील. दिव्याची काजळी वेळेवर काढायला हवी नाहीतर तो विझतो. पालक आपल्याला काहीच बोलत नाहीत या भ्रमात मुले राहतील. त्यांची चुक त्यांचं चुकीचं वागणं त्यांना समजावून दिलं तर तेही आयुष्यात लख्ख तेजाळतील. निदान समोर दगड आहे हे तरी त्यांना आपल्या बोलण्यातून नक्कीच समजेल.

थोड्या दिवसापूर्वी मी वर्तमानपत्रात एक बातमी वाचली होती की सकाळच्या कॉलेजला सहा ते सात मुले मुली कॉलेजमध्ये जातांना बाहेर पडतात. मास्क लावतात, डोक्याला मुली ओढणी बांधतात. त्यामुळे ही मुले कुणाची आहेत हे कळतही नाही. ती कॉलेजमध्ये न जाता परस्पर पन्हाळ्याला जातात. तिथे मौज-मजा करतात. कॉलेज सुटायच्या वेळी घरी येतात. अशा मुलांचे पुढे जीवनात काय होणार! अशी बरबाद होणारी मुले पाहिली की मन विषण्ण होते!

पूर्वीच्या तुलनेत आता मुला- मुलींच्यामध्ये मोकळेपणा वाढला आहे. मोकळेपणा जरूर असावा पण तो जीवनाला उध्वस्त करणारा नसावा. त्यामुळेच तर पालकांच्यावर खूप जबाबदारी आहे. आपण जन्म दिलेली मुलं सुसंस्कारित होतील. अमावस्येला लावलेल्या दिव्याप्रमाणे ती लख्ख प्रकाशमान होतील हे, पाहिलेच पाहिजे. दिव्याची अमावस्या साजरी त्यातून मिळणारा संदेश पहायला हवा. प्रत्येक सणामागील हेतू पहायला हवा. नुसतीच एक परंपरा कर्मकांड म्हणून आपण ते करायचे नाही. त्यातील खरा अर्थ पहायचा आहे. मुलांना तो समजून सांगायचा आहे.

चांगल्या मार्गावरून चालत जाण्यासाठी दिवा हा एक उत्तम मार्गदर्शक आहे. जीवनाचा मार्ग छान उजेड असेल तर आपण त्यावरून सुखरूप चालू शकतो. त्यासाठीच तर चांगल्या संस्कारांचे दिवे लख्ख घासून पुसून ठेवायला हवेत. देवघरातील दिवा तर घरात प्रकाश पाडतो पण संस्काराचा दिवा आयुष्य उजळून टाकतो.

कुणी परोपकाराचा दिवा लावेल, कुणी काटकसरीचा तर कुणी प्रयत्नवादाचा, कुणी परमार्थाचा दिवा लावून दीप अमावस्या अनेक दीप ज्योती लावून साजरी होईल.

काही लोक या अमावस्येला गटारी अमावस्या म्हणतात. वास्तविक गटार हा इंग्लिश शब्द आहे. ही गतहारी अमावस्या आहे. यापुढे आपला आहार हा बदलायचा असतो. म्हणून तर पुढील चार महिन्यात व्रतवैकल्ये सांगितले आहेत. त्यानिमित्ताने आहारात बदल हवा. आपल्या प्रत्येक सणामागील हेतू हा खूप चांगला आहे. दारू पिऊन गटारीत लोळण्याचा हा दिवस नव्हेच. ज्यांना गटारीतच लोळायचे आहे त्यांना अमावस्या कशाला पाहिजे? या अमावस्येनंतर मांस भक्षण करायचे नाही हा पण एक महत्त्वाचा संदेश आहे. यापुढील दिवसात हे मटण चांगले नसते. त्यावर अनेक जीव- जंतू चिकटलेले असतात. ते कुणालाही बाधू नयेत त्यासाठी हा नियम. हिंदूचे सगळे सण उत्सव हे आरोग्याशी निगडित असणारे आहेत. ते आपण समजून घेऊन मुलांना समजावून देणे महत्त्वाचे आहे. पुढील पिढी संस्कारहीन बनणार नाही याची काळजी आपण घेतलीच पाहिजे.

# □ नवरात्री

भटक्या टोळीत राहणारा माणूस जेव्हा एका जागी स्थिर रहायला लागला तेव्हा त्याने अनेक शोध लावले. त्याने दिवा शोधून काढण्यासाठी भांडे शोधले. पशु-पक्ष्यांना मारून खाणारा माणूस पेरून खायला शिकला. त्याने अंगावर घालायला वस्त्रे शोधली. हे मूलभूत शोध कोणी लावले त्याचे नाव आपल्याला माहित नाही. पण या सर्वांबद्दल आपण कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नवरात्रीचा सण साजरा करतो.

त्यांची आठवण म्हणून या मूलभूत चार गोष्टींचा आदर करण्यासाठी आपल्याला नवरात्रात याच चार गोष्टी करायला सांगितल्या आहेत.

1. घटस्थापना करणे
2. सतत दिवा लावणे
3. धान्य पेरणे
4. विविध वस्त्राने देवीला पूजणे

प्रत्येक कुटुंबाच्या रोजच्या जीवनात या गोष्टी आणल्या आणि एक उत्तम आणि विकसित मानव घडवायला सुरुवात केली.

भटक्या टोळ्यामध्ये राहणाऱ्या या माणसांना या गोष्टी ज्यांनी शिकवल्या ते खरे ऋषी.

असे नवनवीन शोध लावण्याची सुंदर बुद्धि आणि ती योग्य रीतीने वापरण्याची शक्ती आपल्याला जिने दिली ती सरस्वती.

बुद्धी नीट चालवून दुसऱ्याला न फसवता आपला विकास जिच्यामुळे करायला मिळतो ती महालक्ष्मी.

सरस्वती व लक्ष्मी आल्यावर ती सांभाळण्यासाठी सामर्थ्य लागते ती शक्ती म्हणजे महाकाली.

या देवीच्या नऊ रूपांची आपण नवरात्रात पूजा करतो. आपण देवाला प्रसन्न करण्यासाठी उपवास करीत नाही. तर आपले शरीर शुद्ध करण्यासाठी उपवास करतो.

देव सगळीकडे भरलेला आहे. तो प्रत्येक माणसाच्या हृदयातही आहे. शरीर व मन प्रसन्न ठेवण्यासाठी हा उपवास करावा. हे दोनही जर प्रसन्न असतील तर आपण आपल्या अंतरंगात डोकावू शकतो.

नवरात्रीमध्ये रंग, परंपरा, संगीत आणि नृत्य ह्यांची रेलचेल असतेच. सर्वांनी या सगळयाचा लाभ घेऊन आनंदात राहण्याचे हे दिवस आहेत. आपल्या अंतरंगात वळण्याची आणि आपल्या आत नवी ऊर्जा भरून घेण्यासाठीचे हे दिवस आहेत. नवरात्रीच्या काळात उपवास केल्यास आपल्या आतील परमानंद आणि प्रसन्नतेकडे नेणारा प्रवास सुकर होतो.  त्यामुळे मनाची अस्वस्थता दूर होऊन सजगता आणि आनंद वाढू लागतो. अर्थात ही गोष्ट अनुभव घेण्याची आहे.

आयुर्वेदानुसार उपवासामुळे आपला जठराग्नी पुन्हा प्रज्वलित होतो. आपल्या शरीरातील टाकाऊ विषकण नष्ट केले जातात. शरीरातील पेशीपेशीत नवचैतन्य

जागृत होते. त्यामुळेच उपवास हा शरीरशुद्धीसाठी प्रभावी उपचार ठरलेला आहे. जेव्हा शरीर शुद्ध होते तेव्हा मनही शांत व स्थिर होते.

उपवास व ध्यानाने आपल्यातील सत्व वाढते. सत्व म्हणजे आपल्यातील शांती आणि प्रसन्नतेची गुणवत्ता. परिणामी आपले संकल्प आणि प्रार्थना अधिक प्रबळ होतात. आपण अधिक कार्यक्षम बनतो. स्वतःला पुरेशी ऊर्जा मिळत रहावी म्हणून पुरेसा फलाहार आणि सात्विक अन्नाचे सेवन करणे गरजेचे आहे. हा उपवास अनेक लोक करतात पण आहाराच्या बाबतीत ते योग्य असे नियम पाळत नाहीत. त्यामुळे असा उपवास त्यांना शारीरिक आरोग्यासाठी त्रासदायक ठरतो. तेव्हा योग्य आहार हे फार महत्त्वाचे आहे.

देवीची नवरात्रीची नऊ रूपे आहेत. जेव्हा जेव्हा तामसी, आसुरी व क्रूर लोक प्रबळ होऊन सात्विक लोकांना छळतात तेव्हा त धर्म संस्थापनेकरिता पुनः पुनः अवतार घेते.

नवरात्रात देवीतत्व नेहमीपेक्षा 1000 पटीने अधिक कार्यरत असते. देवीतत्वाचा अधिकाधिक लाभ मिळविण्यासाठी नवरात्रीत साधना केली जाते.

हे सगळे जरी खरे असले तरी आता जे समाजात दृश्य दिसते आहे ते खूप वेगळे आहे.

करोनाची लाट गेली म्हणून ह्यावर्षी महालक्ष्मीला प्रचंड गर्दी करणारे हे लोक रोजच्या व्यवहारात सचोटीने, सत्याने, प्रामाणिकपणे वागतात का हो? समाजाप्रती जी भावना आवश्यक आहे ती त्यांच्याकडे असते कां? तसे जर नसेल तर देवी त्यांच्या मनोकामना कशा काय पूर्ण करेल?

आपल्याकडे धनिक लोक पुष्कळ आहेत. ते स्वतःला हाय-फाय संस्कृतीचे समजतात. अशांच्या मुली तोकडे कपडे घालून सिगरेट फुंकताना दिसतात. कुठं चालली आहे भारतीय संस्कृती! स्वतःच्या मुलांवर योग्य ते संस्कार न करणाऱ्या पालकांचे नवरात्रीचे पूजन कसे काय सार्थकी लागणार? हे सगळे बघून मन खिन्न होते.

नऊ रंगाच्या नऊ साड्या हे एक फॅडच आहे. खरोखर याला कुठलाही धार्मिक आधार नाही. नवरात्रीच्या निमित्ताने पसरवल्या गेलेल्या मार्केटिंग अंधश्रद्धेचे हे उदाहरण आहे. पण दुर्दैवाने असे म्हणावेसे वाटते शिकलेल्या बायका सुद्धा याचा विचार करत नाहीत. मुंबईला लोकल गाड्यांचे प्लॅटफॉर्म पहा. सगळीकडे एकच रंग पसरलेला. सगळ्या नोकरी करणाऱ्या स्त्रिया एकाच रंगाच्या साड्या नेसून ऑफिसला जातात. देवीला ज्या रंगाची साडी नेसवलेली असते त्याच रंगाची साडी नेसली म्हणजे आपल्यात देवत्व येते का? एवढे मात्र खरे कापड दुकानदारांचा मात्र व्यवसाय उत्तम होतो. त्यापेक्षा आपल्या कर्तृत्वाचे रंग जर दाखवले तर तुमचे व्यक्तिमत्व उजळून निघेल.

आपल्याकडे अनेक साधू-संत होऊन गेले. त्यांना आपण गुरुस्थानी मानतो. त्यांची काय शिकवण आहे ते पहा. श्री समर्थ तर म्हणतात विवेकाने विचार करा. मनाला मोहापासून आवरा. त्याला मोकाट सोडू नका. प्रपंच सचोटीने करा. पण परमार्थाला विसरू नका. इंद्रियांना ताब्यात ठेवा.

नवरात्रीच्या निमित्ताने शहरातून गरबा, दांडिया खेळतात. नृत्य हे शरीराला, मनाला आनंद देणारेच आहे. पण त्यात मर्यादा असावी. ते खेळ नुसते निखळ आनंद

देणारे असावेत. आज मुलगे - मुली एकत्र दांडिया खेळतांना दिसतात. पण त्यातूनच अघटीत घटना घडतात.

देवीच्या नवरात्रीच्या निमित्ताने, संयम, साधना, इंद्रिय निग्रह या गोष्टी जो शिकतो त्याला या उत्सवाचा खरा लाभ झाला असे वाटते.

# □ करिअर करणाऱ्या स्त्रीया

आपल्या समाजात आर्थिक परिस्थिती, शिक्षण यावरून चार गट पडतात.

श्रीमंत लोक ज्यांच्या घरी अक्षरशः लक्ष्मी पाणी भरते. भरपूर संपत्ती, कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती आपल्याच डौलात गुंग असणारी. प्रत्येकाला स्वातंत्र्य हवे असणारे अशी असतात. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील मुला-मुलींना पूर्ण स्वातंत्र्य असते. त्यांची संस्कृती हाय- फाय असते. यांच्या कुटुंबातील मुलीही पुष्कळ पुस्तकी शिक्षण घेतात. पण लहानपणापासूनच स्वैर स्वातंत्र्य असल्यामुळे कुटुंबाला धरून राहणे, समाजाप्रती प्रेम याचे संस्कार त्यांच्यावर कमीच झालेले दिसतात. अशा कुटुंबातील मुलींचे वागणे थोडेफार स्वैराचाराचेच असते. कॉलेजमधील मित्र-मैत्रिणींचे ग्रुप, सगळयांचे एकत्र वावरणे, पार्ट्या त्यातूनच काही नको असलेली व्यसने जडतात. फॅशनच्या नावाखाली मुलींचे वर्तनही स्वैराचाराचे असते. इतर समाजापासून ही मंडळी तुटली जातात. व्यक्तिमत्व विकास म्हणजे काय याचा विचार त्यांनी कधीच गांभीर्याने केलेले नसतो. पुस्तकी शिक्षण भरपूर घेतात. पण संपत्ती विपुल असल्यामुळे आणखी पैसा मिळवणे जरुरीचे नसते. त्यामुळे ऐहिक उपभोग घेणे हे यांचे ध्येय असे वाटते.

अर्थात याला पण काही अपवाद निश्चित आहेत. आदरणीय सुधा मूर्तींचेच घ्या. इन्फोसिस सारख्या मोठ्या कंपनीच्या सर्वेसर्वा असूनही अतिशय साधी राहणी. समाजाप्रती विलक्षण प्रेम व आदर. दुसऱ्याची अडचण ओळखून त्याला आर्थिक

मदत करणाऱ्या. अगदी मोलकरीणींची सुद्धा जातीने चौकशी करणाऱ्या, स्वतःचे व्यक्तिमत्व उत्तुंग असूनही जमिनीवर पाय असणाऱ्या अशा व्यक्तींसमोर नतमस्तक व्हायला होतेच. याला आई-वडिलांचे संस्कार हे ही कारणीभूत आहेत. इंजिनिअर असून सुद्धा सर्व कामाचा व्याप सांभाळून यांनी उत्तम कथा लिहिल्या. त्यांच्या कथा वास्तववादी असतात. त्यांची राहणी, बोलणं पाहिल्यावर त्या आपल्यासारख्याच मध्यमवर्गीय कुटुंबातल्याच वाटतात. त्यांना करिअर करतांना अडचणी आल्या नसतील का हो? पण कुठेच तसे दिसत नाही. आपल्या सर्व नातेवाईकांच्या बरोबर त्यांचे प्रेमाचे संबंध आहेत. त्यांनी आपण मिळवलेल्या संपत्तीचा समाजाला उपयोग करून दिला. संत सुद्धा परोपकाराला महत्त्व देतात.

उच्च मध्यमवर्गीय मुली थोड्या कोंडीत सापडतात. त्या उच्च शिक्षण घेतात. करिअरला खूप महत्त्व देतात. व्यवसाय, नोकरी यामुळे पैसाही भरपूर मिळवतात. पण आपल्या करिअर पुढे त्यांना कुटुंबातील सर्व सदस्यांना प्रेमाने धरून राहणे हे यांना फारसे जमत नाही व आवडतही नाही. या विवाह करतात पण विवाहामुळे येणाऱ्या जबाबदाऱ्या यांना नको असतात. समानतेच्या भोक्त्या असल्यामुळे नवऱ्यानेही कुटुंबाच्या जबाबदाऱ्या आपल्या इतक्याच घेतल्या पाहिजेत अशा मताच्या. त्यामुळे नवरा-बायकोमध्ये कुरबुरी वाढतात. मुले जन्माला घालतात पण आपली करिअर सोडायची नाही म्हणून मुलाला पाळणा घरात ठेवतात. बिचारे मुल आई-वडिलांच्या प्रेमाला पारखे होते. अशा स्त्रीने करिअर करू नये असे नाही. पण मूल थोडे मोठे होऊ दे. त्याचा सांभाळ उत्तम संस्कारने कर. त्याला प्रेम दे. यातही खूप आनंद व समाधान आहे. आपण आपले मूल उत्तम नागरिक म्हणून घडवतो आहोत हे समाधान निश्चितच मिळते. नवरा बायको कितीही समान मानले तरी

निसर्गानेच तिला काही गोष्टी नवऱ्यापेक्षा वेगळ्या दिल्या आहेत. त्या मान्य करायलाच हव्यात. काही वर्षे करिअर बाजूला ठेवले तर काही आकाश कोसळणारे नसते!

तिसरा गट मध्यमवर्गीयांचा. यांच्या मुलींना मात्र करिअर, घर, संसार, मूल अशा अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो. शिक्षण असेल तर नोकरी स्वतःसाठी व संसाराची संपत्तिक स्थिती चांगली असण्यासाठी करावी लागते. आजकाल महागाई प्रचंड आहे. नुसत्या नवऱ्याच्या मिळकतीवर चांगले राहणीमान ठेवता येत नाही. तिच्यावर आई-वडील आजोबा आजी यांच्या एकत्र कुटुंबाचे संस्कार झालेले असतात. त्यामुळे नोकरी करून दमून-भागून आल्यावर सुद्धा घरी स्वयंपाकघर सांभाळावे लागते. सासूबाई कितीही चांगल्या असल्या तरी आई होऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्याशी जमवून घ्यावे लागते. तरी हल्ली खूप कुटुंबामध्ये मुलाच्या शेजारीच फ्लॅट घेऊन सासू-सासरे स्वतंत्र राहतांना दिसतात. हा एक चांगला तोडगा आहे. सर्वांनाच स्वातंत्र्य मिळते. एकमेकांचे हवे- नको बघता येते.

चौथा गट हा कामकरी लोकांचा. यांच्या बायका घरी धुणे, भांडी, पोळ्या करणे ही कामे करतात. यांना शारीरिक कष्ट खूप पडतात. यांचे नवरे परिस्थिती नसून सुद्धा व्यसने करतात. या बायकांचे नवऱ्यांच्या व्यसनापाई हाल होतात. काही बायका जिद्दीने मुलांना शाळेत पाठवतात. कष्टातून मिळवलेल्या पैशातूनच मुलांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. एकूण काय जगी सर्व सुखी असा कोण आहे? विचारे मना तूच शोधोनि पाहे!

# □ पंढरीची वारी

माझे एक स्नेही नुकतेच पंढरीच्या वारीला जाऊन आले. त्यांची ही दहावी वारी! करोनामुळे तीन ते चार वर्षे जाता आले नव्हते. त्यामुळे कधी एकदा 29 ऑक्टोबर येतो आणि वारीला जायला मिळते असे त्यांना झाले होते. वारीला जाणे हे वारकऱ्यांसाठी किती महत्त्वाचे असते नां! पांडुरंगाचे दर्शन घ्यायला या मंडळींच्या भावना इतक्या उचंबळून आलेल्या असतात. ते इतके पांडुरंगाला भेटायला अधीर झालेले असतात की त्यांच्या भावना शब्दात मांडणेही अवघड!

मिरजेहून श्री. ऋषिकेश बोडसांची दिंडी 29 ऑक्टोबरच्या पहाटे निघते. 28 ऑक्टोबरच्या रात्रीच वारीला जाणारी मंडळी एकत्र गोरे मंगल कार्यालयात राहतात. झोपायला रात्रीचे दहा वाजून सुद्धा ही मंडळी पहाटे 3 लाच उठतात. अर्ध्या- पाऊण तासात सर्व आवरून झाले की त्यांची दिंडी भजने म्हणत निघालीच. पहाटेची थंडी त्यामुळे चालणेही थोडे भरभरच असते. 7 वाजले की ठरलेल्या एका ठिकाणी थांबणे चहा घेणे की पुन्हा चालणे सुरू. वाटेत एके ठिकाणी नाश्ता मग चालणे थांबवून एक वाजता जेवण. सकाळची थंडी जाऊन कडक उन्हात वारी चाललेली. संध्याकाळी 7 वाजता पहिला मुक्काम. चाल झाली 35 किलोमीटर. एका दिवसात 35 किलोमीटर चालणे. चालण्या पाठीमागे मानसिक जबरदस्त शक्ती! 29 ऑक्टोबरला सुरू झालेली पायी दिंडी 1 नोव्हेंबरच्या रात्री 8 वाजता पंढरपूरला पोहचते. 140 किलोमीटर अंतर केवळ चार दिवसात पार केले. जबरदस्त इच्छाशक्ती

असल्याशिवाय ही चाल अशक्यच! पोहचल्या नंतर हातपाय धुवून श्री पांडुरंगाचे दर्शन! मग पंढरपुरातच दोन दिवस मुक्काम. विठ्ठलामध्ये काहीतरी वेगळेपण आहे हे नक्कीच म्हणून तर लाखोच्या घरात लोक कार्तिकी एकादशीच्या वारीला जातात.

देवाचे अनेक अवतार आजपर्यंत आपण पहात आहोत. काहींचे अवतार हे दुष्टांच्या संहारासाठी झाले! पण विठ्ठलाचा अवतार हा केवळ भक्तांच्या भेटीच्या आनंदासाठी!

पुंडलिक कुठल्याही संकटात सापडला नव्हता किंवा त्याने विठ्ठलाचा धावाही केला नव्हता. कारण आपण भगवंताच्या अनेक कथा ऐकल्या आहेत की भगवंत हा भक्त संकटात सापडला असेल तर त्याच्या हाकेला धावून येतो व त्याला संकटातून सोडवतो.

पुंडलिक तर आई-वडिलांची सेवा करत होता. तरीही एखाद्या मित्राला भेटायला जावं तसं विठ्ठल त्याला भेटायला आले. पुंडलिक सेवेत दंग त्यामुळे त्याने विठ्ठलाला थांबायला सांगितले. पण देव चिडले नाहीत ते तसेच तिष्ठत उभे राहिले. म्हणजे त्यांनाही आधी कर्म हे पटले होते.

आपण इतर देवता पाहतो कुणाला चार हात तर कोणी अष्टभुजा! त्यांच्या हातात आयुधही असतात. काही देवांना तर एकापेक्षा अधिक मस्तके असतात. अशा देवतांच्या अंगी अद्भुत शक्तीही असते. देवालयातील त्यांच्या मूर्तीही सामर्थ्य दर्शक असतात. पण विठ्ठलाचे तसे नाही. त्याचं रूप मानवी आहे. तो नुसता कमरेवर हात ठेवून उभा आहे. भक्ताची जणू काही वाट बघत त्याने कुठल्याही राक्षसाचा वध

केलेला नाही किंवा पर्वतही उचलला नाही तर भक्तासाठी त्याच्या घरी जाऊन कष्टाच्या कामात मदतच केलेली दिसते.

जनाबाईला तो दळण कांडणात मदत करतो. गोवऱ्या वेचायला मदत करतो. त्यानं दामाजीची रसद भरली. बादशहाची जिरवली. सखुच्या सासूची मारहाण सोसली. सामान्य माणूस करेल अशीच ही कामं! त्याच्यामध्ये केवळ प्रीती दिसून येते. संतांच्या काळी तर प्रथम विठ्ठलाला आलिंगन देण्याची प्रथा होती. पण काळाच्या ओघात ती लोप पावली.

प्रथम भेटी आलिंगन! मग वंदावे चरण! आधी आलिंगन मग नमस्कार! देवाला मिठी मारण्याची प्रथा दुसरीकडे कुठे आढळत नाही. आजही पंढरीला जाऊन आलेल्या वारकऱ्यांना आपण आधी आलिंगन देतो व मग नमस्कार करतो! आलिंगनामधील प्रिती काही वेगळीच आहे!

पंढरीची ही वारी ही वेगळीच आहे! काशी, रामेश्वर या यात्रा जन्मातून एकदाच केल्या जातात. पण पंढरीच्या वारीचे व्रत घेतले की, वारकरी न चुकता दरवर्षी वारी करतात. पापनाश, पुण्यसंचय किंवा मोक्ष यासाठी ही वारी नाही तर ती पूर्णपणे निष्काम वृत्तीने केली जाते! वारकरी पंढरीला आपले माहेर मानतात. विठ्ठला पुढे ते आपल्या तक्रारी सांगत नाहीत. तर वारकरी विठ्ठलाचे डोळे भरून दर्शन घेतो. आणि आनंदाने समाधानाने आपल्या संसारात परत जातो.

जात, पात वर्ण-भेद हे काहीही वारीत नसते.

म्हणून तुकाराम म्हणतात-

ऐसे संत जन ऐसे हरीचे दास

ऐसा नाम घोष सांगा कोठे

तुका म्हणे आम्हा अनाथा कारणे

पंढरी निर्माण केली देवे!

वारीहून परतलेल्या माझ्या स्नेह्यांना मी विचारलं कशी काय झाली वारी तर ते म्हणाले वारीमुळे एक नवीन ऊर्जा,एक आनंद, जगण्याचे एक नवीन बळ, एक वेगळीच अनुभूती, जगाकडे पाहण्याचा एक नवीन दृष्टिकोन मिळाला. खरंच पांडुरंगाची लीला अगाध आहे. 140 किलोमीटर चालण्याचा काहीही त्रास झाला नाही. आल्यानंतर दोन ते तीन तासात माझं सगळं आवरलं व पुन्हा माझ्या रोजच्या पोटाच्या व्यवसायाला सुरुवात केली!

असा ध्यास हे वारकरी घेतात. आणि पुन्हा पुढील वर्षी वारीला जातातच.

R.S.S. जे लोक तर केवळ वारकऱ्यांच्या सेवेसाठी पंढरपूरला जातात. वाटेत स्वच्छता करतात. बरोबर फिरते दवाखाने नेतात. ज्यांना जरूर असेल त्यांना औषधे देतात. मी तरी या वारीबद्दल एक माहिती वाचली होती की वारीत काही लोक वयस्कर असतात. त्यांना तेलाने मालिश करून देण्यासाठी काही लोक जात असतात.

वारकऱ्यांची सेवा करणे हे ही मोठेच काम आहे. कर्माला महत्व देणाऱ्या पुंडलिकाप्रमाणेच ही पण मंडळी श्रेष्ठच आहेत. हे कर्म करण्याची भावना,विचार, त्यांच्या मनात निर्माण करणारा तो विठ्ठलच!

# □ पितृपंधरवडा

पितृपक्षात आवर्जून पितरांना जेवू घालण्याची प्रथा आपल्याकडे आहे. आश्चर्य याचे वाटते की माणसाची जिवंतपणी जेवढी काळजी घ्यायला हवी तेवढी काळजी बऱ्याच जणांकडून त्यावेळी घेतली जातच नाही. पण या पितृपक्षात त्या मृत व्यक्तींची अधिक काळजी घेतली जाते. वर्षश्राद्ध अगदी न चुकता करणारे लोक आहेत. जीवंत आई-बापांची हेळसांड केली तरी त्याचे काहीच वाटून न घेता त्यांच्या मरणानंतर त्यांच्या आत्म्याला शांत करण्यासाठी हे सर्व क्रियाकर्म करणारच. मेलेल्या माणसाचे भय आपण किती बाळगतो पहा! जीवंत माणसाच्या आत्म्याला क्लेश देतांना आपल्याला काहीच वाटत नाही. त्याबद्दल आपल्याला भय वाटत नाही. कमाल वाटते या गोष्टीची!

वर्तमानपत्रात बातमी वाचली जन्मदात्याचा मृतदेह ताब्यात घेण्यास मुलाने नकार दिला. आणि फोन बंद करून ठेवला. हे गृहस्थ भुकेने व्याकूळ अवस्थेमध्ये पडले होते. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना फळे जेवण देऊन रुग्णालयात दाखल केले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला.

वडिलांचे बरोबर काहीही मतभेद असले तरी जन्मदात्याचे अन्नासाठी हाल होणे आणि मृत्यु नंतरही मुलाला थोडा सुद्धा मायेचा पाझर फुटू नये याला काय म्हणावे? भावना, संवेदना थोड्या सुद्धा नसाव्यात यासारखे दुर्दैव ते कोणते?

हाच मुलगा वडिलांचे श्राद्ध घालेल. पितर जेवू घालेल आणि पापातून मुक्त झाल्याचे समाधान मानेल.

संस्कृती मधून काढलेल्या ह्या पळवाटा आहेत. पाप कर्म करून गंगेत स्नान केल्याने ते धुवून जाईल का? अरे तुझे स्नानाने शरीर शुद्ध होईल पण तुझे मन शुद्ध होईल का?

संत तुकाराम म्हणतात- भुके नाही अन्न, मेल्यावरी पिंडदान!

अशी कितीतरी उदाहरणे मी पाहते. घरात वृद्ध आई-वडिल एकाकी पडतात. घरात माणसे असूनही त्यांच्याशी संवाद कोणीच करत नाही. घरातल्या तरुणाईला त्याबद्दल काहीच खेद वाटत नाही. म्हाताऱ्या आई-वडिलांशी काय बोलायचे असते असा त्यांना गहन प्रश्न पडतो. उलट वृद्ध मंडळींना चमचमीत जेवण लागतच नाही. त्यांना प्रेमाने आपल्याशी घरच्यांनी दोन शब्द बोलावेत. आपली विचारपूस करावी ही इच्छा असते. पण कुठल्या घमेंडीत तरुण असतात कळत नाही.

संत कबीर म्हणतात-

जिंदा बाप कोई न पूजे, मरे बाद पुजवाये|

मुठ्ठीभर चावल लेके कौए को बाप बनाए||

जीवंतपणी सासू-सासऱ्यांना, आई-वडिलांना न जपणारे त्यांच्याशी सुखसंवाद न करणारे मात्र भीतीपोटी पितृपक्षात पितरांना जेवू घालतात.

एक ताई, शेजारी राहणाऱ्या वृद्ध दांपत्याबद्दल जिव्हाळा वाटत असल्यामुळे सुनेच्या नकळत त्यांना काही-बाही चांगले पदार्थ नेवून द्यायची. पण सुनेला हे कळल्यावर तिने ताबडतोब ते देणे बंद करावयाला लावले. काही दिवसानंतर त्या

दोघांपैकी आजोबांचा मृत्यु झाला. आजीला असेच वाटायचे की माझ्या आधी आजोबांना स्वर्गवास व्हावा. मी आधी गेले तर अजूनच त्यांचे हाल होतील.

मला तर वाटतं कितीतरी पालक असा कोंडमारा करून जगत असतील.

आजकाल परदेशी स्थायिक असलेल्या मुलांना आपल्या आई-वडिलांच्या अंत्यविधीलाही यायला सवड नसते. बऱ्याच आई-वडिलांना वृद्धाश्रमात आपला उर्वरित काळ घालवावा लागतो.


जीवंतपणीच आई-वडिलांना सुख- समाधान द्या. म्हणजे आपल्या अंतरात्म्याला पापाची भिती तरी निदान राहणार नाही. पश्चातापाचे भूत ज्यांच्या आत्म्याला वाटते ते पितृपक्षात असे कर्मकांड करतात.


जिवंतपणीच आई-बाबांना चांगले जेवू-खावू घाला. त्यांची सेवा करा त्यांना माया द्या.

पितृपंधरवडा हा पितरांच्या उद्धारासाठी आहे हे अगदी खरे. आपल्या पितरांचा म्हणजे पूर्वजांचा उद्धर व्हावा यासाठी धार्मिक विधी केले जातात. माणूस मेल्यावर त्याला हा देह सोडावा लागतो. पण त्यांच्या या आयुष्यातील ज्या काही इच्छा वासना तृप्त झाल्या नसतील त्या हा देह सोडल्यावर सूक्ष्म देहाबरोबर त्या राहतात व त्यांना त्या वासना तृप्तीसाठी पुनर्जन्म मिळतो. सूक्ष्म देह दुसऱ्या स्थूल देहात प्रवेश करतो. म्हणून तर वेळोवेळी समर्थ रामदास सांगतात अरे, तुझा कर्ता राम आहे. त्याची भक्ती कर. निरपेक्ष भावनेने या देहाकडून विहित कर्म कर. पण रामाला विसरू नकोस. असा हरीभक्त केवळ स्वतःचाच उद्धार करत नाही तर आपल्याबरोबर 21 कुळांचाही उद्धार करतो. भक्त प्रल्हादांच्या भक्तीमुळे त्याच्या पित्याचा तर उद्धार

झालाच पण त्याच्या 21 पूर्वजांचाही उद्धार झाला. असे हरीभक्त जे होतात ते आपल्या उत्तम कर्मामुळे आपल्या पितरांचा उद्धार करतात. तेव्हा प्रपंच करीत असतांना या भगवंताला विसरू नका. हरीभक्त परायण व्हा म्हणजे तुमच्या कुळाचा तुमच्या भक्तीमुळे नक्कीच उद्धार होईल. हे आहे पितृपक्षाचे महत्त्व!

जयश्री पटवर्धन यांची ईसाहित्य वरील पुस्तकं. क्लिक करताच उघडेल






मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्या-बरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

ज्येष्ठ नागरिकांना तर आम्ही यापुढे जाऊन एक विनंती करू इच्छितो. आपले अनुभव लिहा. आपले आयुष्य शब्दांत मांडा. लिहिणे जमत नसेल तर मोबाईलवर तुमच्या आवाजात रेकॉर्ड करा. तुमच्या आयुष्ताल्या घटना या येणाऱ्या पिढ्यांना दिपमार्ग ठरतील.

बाकी आमच्यावर सोपवा.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

लिहायलाही हवं!

www.esahity.com
esahity@gmail.com
9869674820